cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७६ | मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



## थोडक्यात...

### पत्रकार तरुण तेजपाल यांचे न्यायालयात आत्मसमर्पण

पणजी: तहलकाचे माजी संपादक-इन-चीफ तरुण तेजपाल यांनी २०१३ च्या बलात्कार प्रकरणात सोमवारी गोव्यातील म्हापसा न्यायालयात आत्मसमर्पण केले. बॉम्बे उच्च न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तीन आठवड्यांत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले होते. आत्मसमर्पणानंतर तेजपाल यांना उत्तर गोव्यातील कोलवाळ मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले, जिथे ते १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा भोगतील. सर्वोच्च न्यायालयात त्यांच्या दोषसिद्धी आणि शिक्षेविरुद्धच्या अपीलावर २२ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. २५ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने तेजपाल यांची आत्मसमर्पणातून सूट देण्याची याचिका फेटाळून लावली होती. न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने त्यांना तीन आठवड्यांच्या आत आत्मसमर्पण करण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने असेही म्हटले होते की, आत्मसमर्पणाचे प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर त्यांच्या फौजदारी अपीलाची २२ सप्टेंबर रोजी सुनावणीसाठी यादी केली जाईल. प्रमाणपत्र २१ सप्टेंबरपर्यंत सादर करावे लागेल. ६ ऑगस्ट रोजी बॉम्बे उच्च न्यायालयाने तेजपालला २०१३ मध्ये एका कनिष्ठ महिला सहकाऱ्यावर बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवले होते.

### बळीराजासमोरील संकटे दूर व्हावीत–मुख्यमंत्री

मुंबई: गणेश चतुर्थीनिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी गणेशभक्तांना शुभेच्छा देत बळीराजासह सर्वांच्या जीवनातील विघ्ने दूर व्हावीत, अशी प्रार्थना विघ्नहर्त्याच्या चरणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १४ सप्टेंबर) जगातील सर्व गणेशभक्तांना गणेश उत्सवाच्या, गणेश पर्वाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या. विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनामध्ये आनंद आणावा. सर्वांची विघ्नं दूर करावीत. आपला देश, राज्य, आपले नागरिक, आपला बळीराजा यांच्यासमोरील संकटे दूर व्हावीत. ही विघ्नहर्त्याच्या चरणी प्रार्थना, अशी भावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबई येथील शासकीय वर्षा निवासस्थानी श्री गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुंबई, महाराष्ट्रात सगळीकडे अतिशय आनंदाने गणशोत्सव साजरा होत आहे. उत्साह ओसंडून वाहत असल्याचे त्यांनी म्हटले.वर्षा निवासस्थानी आम्ही गणेश स्थापना केली आहे. हे गणेशपर्व आपण सगळे अतिशय आनंदाने साजरे करु, असा मला विश्वास आहे, असे ते म्हणाले.

### शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजारांची मदत द्या

मुंबई : महाराष्ट्रात दुष्काळ पडलेला आहे. सुरुवातीला लांबलेल्या पेरण्या आणि त्यानंतर पावसाने मारलेली दडी यामुळे हातातोंडाशी आलेला घास गेलेला आहे. पिके करपली आहेत. पाऊस आला जरी त्याचा उपयोग पिकांना होणार नाही. यामुळे सरकारने शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. ही मदत जाहीर करत असताना संपूर्ण कर्जमाफीच्या अनुषंगानेदेखील सुधारित शासन निर्णय काढावा. कर्ज पुनर्गठणाची वेळ न येता संपूर्ण कर्जमाफी व्हावी. आगामी रब्बी हंगामात शेतकऱ्यांना खते, बियाणे आणि कीडनाशके सरकारच्या माध्यमातून पुरवण्यासाठी योजना आणावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१२ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६६.५० क्विंटल | २,६४१ | ३,४४९ | २,८२९ |
| ज्वारी/हायब्रिड: १०१.५० क्विंटल | २,७०२ | ५,३३१ | ३,६७८ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,००० | ८,००० | ७,००० |
| उडीद :२२.५० क्विंटल | ७,८०० | ८,५८० | ८,१७७ |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | २,३०० | २,९५७ | २,७९९ |
| मुग: २२.०० क्विंटल | ५,००० | ९,६५० | ८,९०७ |
| सोयाबीन: ३०.०० क्विंटल | ५,५०० | ५,७९० | ५,६४५ |
| हरभरा: १७.५० क्विंटल | ५,४०० | ६,२०० | ५,८५८ |

# सोयाबीनसह चार पिकांचे नवे वाण शेतकऱ्यांच्या सेवेत!

## 'जॉईंट ॲग्रेस्को'मध्ये ४२ तंत्रज्ञान शिफारशी; 'एमएयूएस ७९१', 'राजकेशर', परभणी खरबूज, दुधी भोपळा आणि कारलीला हिरवा कंदील

दापोली । वृतसंस्था

राज्यातील शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणारे, बाजारपेठेच्या गरजा पूर्ण करणारे आणि विविध प्रतिकूल परिस्थितीत उपयुक्त ठरणारे नवे वाण व आधुनिक कृषि तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील चारही कृषि विद्यापीठे आणि पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान ५४ वी संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती अर्थात 'जॉईंट ॲग्रेस्को' बैठक–२०२६ पार पडली. या बैठकीत वसंतराव



नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संशोधन विभागाने विविध पिके, उत्पादन तंत्रज्ञान, कृषि अवजारे आणि अन्य कृषि विषयांशी संबंधित तब्बल ४२ तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या.

या शिफारशींमध्ये शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या सोयाबीन, आंबा आणि भाजीपाला पिकांच्या नव्या वाणांचा समावेश आहे. वाण प्रसारणासंदर्भात सोयाबीनचे एक, आंब्याचे एक आणि भाजीपाला पिकांचे तीन अशा एकूण पाच वाणांच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत.

### संशोधनातून शेतकऱ्यांना नवे पर्याय...

'जॉईंट ॲग्रेस्को'च्या माध्यमातून कृषि विद्यापीठांकडून विकसित करण्यात आलेल्या संशोधन तंत्रज्ञानांचे परीक्षण करून त्यांचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा होईल का, याचा विचार केला जातो. यंदाच्या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने सादर केलेल्या ४२ शिफारशींमुळे मराठवाड्यासह राज्यातील शेतकऱ्यांना विविध पिकांमध्ये अधिक उत्पादन, बाजारपेठेची मागणी आणि पिकांच्या गुणवत्तेच्या दृष्टीने नवे पर्याय उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याशिवाय कृषि अवजारांशी संबंधित चार शिफारशीही बैठकीसमोर मांडण्यात आल्या.

'एमएयूएस ७९१' सोयाबीनसाठी शिफारस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी ▶▶ पान २ वर

# मराठा समाजाचा मोर्चा स्थगित मनोज जरांगे एकटेच मुंबईला जाणार!

## मराठ्यांच्या पोरांवर दंगलीचे गुन्हे दाखल करण्याचा सरकारचा डाव असल्याचा गंभीर आरोप

जालना । प्रतिनिधी

**मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी आंतरवाली सराटीमध्ये पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली. मुंबईला जाण्यासाठी मराठा समाजाची जी तयारी सुरू आहे ती थांबविण्यास त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सणावाराच्या आडून डाव टाकला आहे. मराठ्यांच्या पोरांवर दंगलीचे गुन्हे दाखल करण्याचा डाव आहे, असे ते म्हणाले.**



आपल्याला मुंबईत आंदोलनासाठी परवानगी नाकारली आहे. मात्र, मी एक–दोन गाड्या घेऊन मुंबईला निघणार आहे. मी एकटाच आंदोलन करेल, मग तरी परवानगी देतील ना, असे जरांगे पाटील म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले, १५ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता मी मुंबईला निघणार आहे. जीव द्यायची वेळ आली तरी मुंबईला जाणारच, दिलेला शब्द परत घेतला जाणार नाही. जीव देईल पण समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का लागू देणार नाही, मी दोन गाड्या घेऊन निघणार आहे. मुंबईला जाताना माझ्यासोबत केवळ दोन गाड्या असणार आहेत आणि पाच–दहा माणसांपेक्षा माझ्यासोबत कोणी नसेल. १५ तारखेला एकटा जाणार, मराठ्यांच्या वाटेतील काटे मला काढू द्या, मला खिंड लढू द्या, मग मी तुम्हाला कोणत्या दिवशी यायचे ते सांगतो, असे देखील ते म्हणाले. याआधी जाहीर केलेल्या मार्गानेच मुंबईला जाणार, जेथे मुक्काम आहे तेथे मी मुक्काम करणार, समाजातील लोकांना, तालुक्यातील लोकांना तेथे भेटायला येता येणार आहे. जे स्टेज मुक्कामाच्या ठिकाणी तयार केले होते. तेथेच मी थांबणार आणि उपोषण सुरूच ठेवणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. मी मराठ्यांनी ▶▶ पान २ वर

## प्राण्यालाही लाज वाटेल असे सरकार जरांगेच्या पुढे मान वाकतेय- वडेट्टीवार



नागपूर । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली असली, तरी ते मुंबईकडे जाण्यावर ठाम आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. जरांगे पाटील यांच्या आंदोलनावेळी सरकारमधील मंत्री वारंवार त्यांच्या भेटीला जातात आणि सरकारची भूमिका झुकलेली दिसते, असा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली.

''जरांगे यांच्या आंदोलनात इतक्या वेळा मंत्री गेले आणि आता पुन्हा तेच बोलण्याची पाळी आली आहे. ते माना वाकवत जातात. त्यांची मान कशी तुटत नाही, मला समजत नाही. इतक्या खाली मान वाकते की एखाद्या पाळीव ▶▶ पान २ वर

## भाषा कोणतीही असो, भावना भारतीय असली पाहिजे–अमित शाह

नवी मुंबई । प्रतिनिधी



महाराष्ट्रासारखा बहुभाषिक प्रदेश देशात एकमेव आहे. महाराष्ट्रातील बहुभाषिक संस्कृतीला मी सलाम करतो. मातृभाषा अत्यंत महत्त्वाची आहे. मातृभाषेशिवाय आपण प्रगती करूच शकत नाही. भाषा कोणतीही असो, मात्र भावना भारतीय असली पाहिजे, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. भाषेचे राजकारण करणाऱ्यांना उद्देशून बोलताना, लहान मुलगा आपल्या मातृभाषेतूनच देशाला पुढे नेऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. नवी मुंबई येथे रविवारी (दि. १४ सप्टेंबर) आयोजित सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात ते बोलत होते.

यावेळी अमित शाह यांनी सर्व हिंदीप्रेमींना प्रणाम करत हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आज हिंदी दिवस आणि गणेशस्थापनेचा ▶▶ पान २ वर

## 'एक गाव, एक गणपती' संकल्पनेतून सामाजिक सलोख्याचा जागर

### १७३८ ठिकाणी बाप्पाची प्रतिष्ठापना ३०० गावात एक गाव एक गणपती

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असून, सोमवारपासून वाजत–गाजत लाडक्या बाप्पाचे घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये आगमन होत आहे. विशेष म्हणजे, सामाजिक ऐक्य आणि सलोखा वृद्धिंगत करणारी 'एक गाव, एक गणपती' ही आदर्श संकल्पना जिल्ह्यात आजही तितक्याच प्रभावीपणे जपली जात असल्याचे चित्र आहे.**




`यावर्षी जिल्ह्यात सुमारे २९२ गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' ही परंपरा कायम राखली जाणार असून, या उपक्रमामुळे गावागावांतील मतभेद दूर होऊन एकात्मतेची भावना अधिक बळकट होताना दिसत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा गणेश स्थापनेच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून, शांतता व ▶▶ पान २ वर

## हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा विधेयक-मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र सरकार नागपुरात होणाऱ्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायदा (यूसीसी) विधेयक मांडण्याच्या तयारीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय समिती सध्या या कायद्याच्या आराखड्यावर काम करत आहे. समितीच्या शिफारशी मिळताच सरकार ते लागू करण्याची प्रक्रिया सुरू करेल, असे फडणवीस यांनी सांगितले.**



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कालच भाजपशासित २१ राज्यांत २०२९ पूर्वी यूसीसी कायदा लागू केला जाईल, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली, हे विशेष. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र सरकारने यूसीसी तयार करण्यासाठी आधीच समितीची स्थापना केली आहे. ही समिती काम ▶▶ पान २ वर

# घडलेल्या घटनांचे वृत्तांकन करणे बदनामी नव्हे



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**एखादे वृत्त कुणाला अप्रिय वाटले, तरी सत्य आणि वस्तुनिष्ठ तथ्यांचे वृत्तांकन बदनामी ठरत नाही, असे हिमाचल प्रदेश आणि झारखंड उच्च न्यायालयांच्या दोन स्वतंत्र निर्णयांतून स्पष्ट झाले आहे. हिमाचल प्रदेशच्या प्रवीण कुमार सैनी हे होमगार्ड म्हणून कार्यरत असतानाच ग्रामपंचायत, सदरपूरचे सरपंच म्हणून निवडून आले होते.**

'दिव्य हिमाचल'ने त्यांच्या दोन्ही पदांबाबत तसेच त्यावरून निर्माण झालेल्या वादाचे वृत्त प्रसिद्ध केले. या वृत्तामुळे प्रतिष्ठेला धक्का बसल्याचा दावा सैनी यांनी केला. निवडणूक लढवण्यापूर्वी आपण ना–हरकत प्रमाणपत्र घेतले होते. मात्र, वृत्तपत्राने ही बाब योग्यरीत्या मांडली नाही, असे त्यांचे म्हणणे होते. दरम्यान पुरेसा आधार नसल्याने हा खटला रद्द करण्यात आला. हिमाचल प्रदेश हायकोर्टाने सैनी होमगार्ड असल्याचे आणि सरपंच म्हणून निवडून आल्याचे तथ्य निर्विवाद असल्याचे नमूद केले. तसेच, ना–हरकत बाबतचे त्यांचे स्पष्टीकरणही वृत्तपत्राने प्रसिद्ध केले होते. या पार्श्वभूमीवर खटला सुरू ठेवण्यास पुरेसा आधार नसल्याचे सांगत खटला रद्द केला. वृत्तांकन करणे हा प्रसारमाध्यमांचा मूलभूत हक्क आणि कर्तव्य दोन्ही आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणा–या प्रसारमाध्यमांना जनतेपर्यंत सत्य, अचूक आणि निपक्षपाती माहिती पोहोचवण्यासाठी वृत्तांकन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेच्या संदर्भातून आणि लोकशाहीच्या दृष्टिकोनातून या हक्काचे महत्त्व खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल. घटनात्मक आधार (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) कलम १९(१)(अ) भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. प्रसारमाध्यमांचा वृत्तांकनाचा हक्क याच कलमांतर्गत येतो. माहितीचा अधिकार जनतेला देशात काय चालले आहे हे जाणून घेण्याचा अधिकार आहे आणि माध्यमांच्या वृत्तांकनामुळेच हा अधिकार खऱ्या अर्थाने अमलात येतो. लोकशाहीचे रक्षण आणि पारदर्शकतासत्तेवर अंकुश सरकार, प्रशासन आणि शक्तिशाली संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवून, त्यांच्यातील त्रुटी किंवा भ्रष्टाचार जनतेसमोर आणण्याचे काम वृत्तांकनाद्वारे होते. ▶▶ पान २ वर

## पंढरीत भाविकांसाठी तीन दिवस विठुरायाचे दर्शन बंद

### पांडुरंगाच्या मूर्तीसाठी लेपन प्रक्रियेला अखेर लागला मुहूर्त

पंढरपूर । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचं आराध्य दैवत असलेल्या पंढरीतील विठ्ठल रुक्मिणी मूर्तीवरील रासायनिक लेपनाची प्रक्रिया करायला अखेर मुहूर्त लागला आहे. त्यानुसार, आता २३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत भारतीय पुरातत्व विभागाकडून विठ्ठल आणि रुक्मिणी मूर्तीवर हे लेपन होणार असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले आहे.**



लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या विठुराया आणि रुक्मिणी माता यांच्या मूर्ती सातत्याने झीजत असल्याने, मंदिर समितीसह भाविकांची चिंता वाढली होती. त्यातच भारतीय पुरातत्व विभागाकडून होणाऱ्या रासायनिक लेपन प्रक्रियेला काही भाविकांनी विरोध करीत न्यायालयात दाद मागितल्याने याला जवळपास तीन महिने उशीर झाला होता. आता मात्र मुंबई ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# मॉडिसन स्क्वेअर गार्डनचा सोहळा : वैश्विक एकतेच्या नावाखाली पीआरचा खेळ?

अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या मॉडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झालेला भव्य कार्यक्रम वरवर पाहता 'एक जग, एक मानवता' आणि धार्मिक ऐक्याचा संदेश देणारा सोहळा वाटतो. हजारो लोकांची उपस्थिती, विविध धर्मांच्या प्रतिनिधींचा सहभाग आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील भव्य व्यासपीठहे चित्र संघासाठी निश्चितच मोठ्या जनसंपर्क यशाचे ठरू शकते. मात्र, या चमकदार चित्रामागे निमंत्रण आणि पारदर्शकतेबाबत उपस्थित झालेले प्रश्न गंभीर असतील, तर त्यांची उत्तरे देण्याची जबाबदारी आयोजकांचीच आहे.

या कार्यक्रमासंदर्भातील एका अहवालात काही अमेरिकन धार्मिक नेत्यांना कार्यक्रमाचे स्वरूप आणि मोहन भागवत यांच्या उपस्थितीबाबत पुरेशी माहिती देण्यात आली नव्हती, असा दावा करण्यात आला आहे. संबंधित ई-मेल आणि निमंत्रणांच्या आधारे हा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. काही निमंत्रितांनी आपण दिशाभूल झाल्याची भावना व्यक्त केल्याचेही सांगितले जाते. हे दावे खरे असतील, तर प्रश्न केवळ एका कार्यक्रमाच्या आयोजनाचा राहत नाही; तो सार्वजनिक प्रतिमा निर्माण करण्यासाठी पारदर्शकतेच्या मर्यादा कितीपर्यंत ओलांडल्या जाऊ शकतात, याचा ठरतो. धार्मिक नेत्यांना एखाद्या आंतरधर्मीय कार्यक्रमासाठी आमंत्रित करणे यात गैर काहीच नाही. उलट, विविध धर्मांच्या प्रतिनिधींनी एकत्र येणे ही लोकशाही आणि बहुविध समाजव्यवस्थेची चांगली खूण आहे. पण त्या कार्यक्रमामागील आयोजक, प्रमुख वक्ते आणि राजकीय-सामाजिक संदर्भ यांची माहिती जाणीवपूर्वक अस्पष्ट ठेवली गेली असेल, तर त्या सहभागाचा अर्थच बदलतो. एखाद्या व्यक्तीला कोणाच्या शेजारी उभे केले जाणार आहे, कोणत्या संस्थेच्या व्यासपीठावर तो उभा राहणार आहे आणि त्या उपस्थितीचा सार्वजनिक अर्थ काय निघणार आहे, हे जाणून घेण्याचा अधिकार निमंत्रित व्यक्तीलाही आहे. आंतरधर्मीय संवाद हा विश्वासावर उभा राहतो; प्रतिमानिर्मितीच्या व्यवस्थापनावर नाही. याच ठिकाणी संघाच्या आंतरराष्ट्रीय विस्ताराच्या प्रयत्नांकडे पाहण्याची गरज आहे. ही भारतातील प्रभावशाली सामाजिक-सांस्कृतिक संघटना आहे. तिची विचारधारा, तिचे समर्थक आणि तिच्यावर होणारी टीकाहे सर्व भारतीय सार्वजनिक जीवनाचा भाग आहेत. परंतु परदेशातील मंचावर संघाची प्रतिमा 'धार्मिक सौहार्द', 'मानवता' आणि 'विविधतेचा स्वीकार' या सार्वत्रिक संकल्पनांच्या माध्यमातून सादर केली जात असेल, तर त्या प्रयत्नात पूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कारण प्रतिमा ही शब्दांनी नव्हे, तर कृतीने तयार होते. एखाद्या संस्थेला स्वतःची जागतिक प्रतिमा सुधारायची असेल, तर त्यात काही गैर नाही. प्रत्येक मोठी सामाजिक किंवा राजकीय संस्था जनसंपर्क करते. प्रश्न तेव्हा निर्माण होतो, जेव्हा जनसंपर्क आणि माहिती लपविणे यांच्यातील रेषा अस्पष्ट होते. एखाद्या कार्यक्रमाला 'आंतरधर्मीय' असे नाव देऊन त्यामागील प्रमुख आयोजक किंवा प्रमुख व्यक्तींची ओळख निमंत्रितांपासून लपवली गेली असेल, तर त्या पद्धतीवर प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक आहे. मॉडिसन स्क्वेअर गार्डनसारख्या जागतिक स्तरावरील प्रसिद्ध स्थळी झालेल्या कार्यक्रमाचे दृश्य माध्यमांमधून जगभर पोहोचते. त्यामुळे मंचावर उभ्या असलेल्या प्रत्येक व्यक्तीची उपस्थिती एक संदेश बनते. त्या संदेशासाठी त्या व्यक्तीने स्पष्ट संमती दिली होती का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कोणाच्याही नकळत त्याच्या उपस्थितीचा वापर एखाद्या संस्थेच्या प्रतिमानिर्मितीसाठी केला जाऊ नये, ही साधी लोकशाही नैतिकता आहे. याहून मोठा प्रश्न संघाच्या नव्या जागतिक प्रतिमेचा आहे. भारतात संघाची विचारधारा आणि त्याच्या राजकीय प्रभावाबाबत तीव्र चर्चा होत असताना, परदेशात त्याच संस्थेची प्रतिमा धार्मिक ऐक्याच्या सौम्य भाषेत मांडली जात असेल, तर दोन्ही प्रतिमांतील अंतर तपासणे आवश्यक ठरते. जागतिक मंचावरची प्रतिमा आणि प्रत्यक्ष विचारधारा यांच्यात किती सुसंगती आहे? हा प्रश्न विरोधकांनीच नव्हे, तर पत्रकारांनी, धार्मिक नेत्यांनी आणि सामान्य नागरिकांनीही विचारला पाहिजे. म्हणूनच या प्रकरणात 'कोण जिंकले आणि कोण हरले' यापेक्षा कोणाला काय माहिती देण्यात आली आणि काय लपवण्यात आले, हा मुद्दा केंद्रस्थानी असायला हवा. आयोजकांकडे स्पष्ट उत्तर असेल, तर ते सार्वजनिक करणे कठीण नसावे. निमंत्रणे, ई-मेल आणि कार्यक्रमाचे अधिकृत स्वरूप याबाबत पारदर्शकता दाखवली, तर वादही दूर होऊ शकतो.

वैश्विक एकतेचा संदेश देण्यासाठी भव्य सभागृहाची गरज नसते; त्यासाठी विश्वासाची गरज असते. धार्मिक सौहार्दाच्या नावाने आयोजित कार्यक्रमातच सहभागी व्यक्तींना आपल्या सहभागाबद्दल नंतर स्पष्टीकरण द्यावे लागत असेल, तर त्या सौहार्दाच्या दाव्यापुढे प्रश्नचिन्ह उभे राहते. मॉडिसन स्क्वेअर गार्डनचा कार्यक्रम संघासाठी आंतरराष्ट्रीय चे यश ठरला असेलही. परंतु त्या यशाची खरी कसोटी गर्दी, प्रकाशझोत किंवा टाळ्यांचा कडकडाट नाही. सत्य किती उघडे होते, सहभागी किती जाणकार होते आणि निमंत्रण किती पारदर्शक होते, हीच कसोटी आहे. वैश्विक मानवतेच्या नावाने उभारलेल्या मंचाला जर माहिती लपविण्याची गरज भासत असेल, तर समस्या मंचाच्या भव्यतेत नाही, तर मंचाच्या नैतिक पायाभरणीत आहे. आणि लोकशाहीत कोणत्याही मोठ्या संस्थेला सर्वात अस्वस्थ करणारा प्रश्न हाच असतो'तुम्ही जगाला नेमके काय दाखवत आहात आणि त्यामागे काय लपवत आहात?'

# मेंदूचा थकवा दूर करायचा तर-डॉ.जगदीश टेकाळे

**अतिरिक्त माहितीचा भडिमार टाळा :- ऑफिस किंवा दिवसभराचे काम संपवून घरी आल्यानंतर लगेच मोबाईलवर रील्स पाहणे, सोशल मीडिया स्क्रोल करणे किंवा सतत नोटिफिकेशन्स तपासणे टाळा. दिवसभर माहितीचा मारा सहन केलेल्या मेंदूला यामुळे विश्रांती मिळत नाही. काही वेळ मोबाईलपासून दूर राहिल्यास मेंदूला शांत होण्याची संधी मिळते.**



शीतपणे फेरफटका मारा: १० ते २० मिनिटे शांतपणे चालणे हा मानसिक थकवा कमी करण्याचा प्रभावी उपाय आहे. चालताना फोनवर बोलणे, गाणी किंवा पॉडकास्ट ऐकणे टाळा. कोणत्याही व्यत्ययाशिवाय चालल्याने मेंदूवरील ताण कमी होतो आणि एकाग्रता पुन्हा सुधारण्यास मदत होते. वातावरणात थोडा बदल करा : एकाच ठिकाणी सतत राहिल्याने मेंदू कामाशी आणि अपूर्ण राहिलेल्या गोष्टींशी जोडलेला राहतो. त्यामुळे काही वेळ दुसऱ्या खोलीत जा, बाल्कनीत बसा किंवा घराबाहेर ताजी हवा घ्या, वातावरणातील हा छोटासा बदलही मनाला आणि मेंदूला आराम देऊ शकतो.साधी शारीरिक कामे करा : स्वयंपाक करणे, आंघोळ करणे, कपडे घडी घालणे किंवा झाडांना पाणी घालणे यांसारखी साथी कामे मेंदूला आराम देतात. या कामांसाठी फार विचार करण्याची गरज नसते, त्यामुळे मानसिक ताण कमी होण्यास मदत होते. अपूर्ण राहिलेली कामे लिहून ठेवा : अपूर्ण राहिलेली कामे सतत मनात घोळत राहतात. त्यामुळे मानसिक थकवा वाढू शकतो. अशावेळी करायच्या कामांची यादी कागदावर किंवा वहीत लिहून ठेवा. त्यामुळे मेंदूला ती कामे लक्षात ठेवण्याचा अतिरिक्त ताण राहत नाही. खूप थकण्यापूर्वीच झोपा : अनेक मानसिक थकवा असूनही उशिरापर्यंत जागतात. मात्र पुरेशी झोप न घेतल्यास दुसऱ्या दिवशी एकाग्रता , मनस्थिती आणि निर्णयक्षमता यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे दररोज ठराविक वेळी झोपणे आणि ७ ते ८ तासांची गुणवत्तापुर्ण झोपे घेणे आवश्यक आहे. दिवसभर काम केल्यानंतर शारीरिक थकवा जाणवणे ही सामान्य बाब आहे. मात्र अनेकांना दिवसाच्या शेवटी मानसिक थकवाही जाणवतो. अशा वेळी एकाग्रता कमी होते, छोट्या-छोट्या चुका वाढतात आणि योग्य निर्णय घेणे कठीण होते. त्यामुळे शरीरासोबत मेंदूलाही विशांती देणे तितकेच महत्त्वाचे आहे या सवयी लावा ::दर ६० ते ९० मिनिटांनी कामातून छोटा ब्रेक घ्या. दिवसभर पुरेसे पाणी प्या आणि संतुलित आहार घ्या., नियमित व्यायाम आणि श्वसनाचे व्यायाम करा.,दररोज ७ ते ८ तासांची शांत आणि पुरेशी झोप घ्या.,काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल राखा. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# आ.सत्यजित तांबे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळवंडी येथे नेत्र तपासणी शिबिर

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

**विधानपरिषद आमदार सत्यजित दादा तांबे यांच्या २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त जयहिंद लोकचळवळ,पाटोदा तालुका यांच्या वतीने विविध समाजोपयोगी व वैद्यकीय उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.याच उपक्रमाचा भाग म्हणून १४ सप्टेंबर रोजी पिंपळवंडी येथे जयहिंद लोकचळवळ,पाटोदा तालुका आणि आनंदऋषी नेत्रालय,अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले.**




शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.विशेषतः ज्येष्ठ नागरिक,शेतकरी,कामगार व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होत नेत्र तपासणी करून घेतली.गरजू नागरिकांना चष्म्याबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यक उपचारांसाठी सल्ला देण्यात आला.सामाजिक बांधिलकी जपत आनंदऋषी नेत्रालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले.तसेच पिंपळवंडी ग्रामस्थांनी नेत्रालयाच्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. यावेळी नेत्रतज्ज्ञ डॉ.किरण कवडे, डॉ.रवींद्र ढगे,डॉ.अनिकेत वावरे, पत्रकार बबनराव उकांडे,कल्याण पवार,अखिल भारतीय जैन संघटनेचे तालुका उपाध्यक्ष विलासशेठ पटवा,जयहिंद लोकचळवळीचे तालुकाध्यक्ष प्रा.अशोक पवार,माजी सरपंच राजेंद्र पवार,प्रशांत पवार,चंद्रशेखर कुलकर्णी,आबाराजे पवार,वैजिनाथ पवार,नाना गाडे,बाबूलाल लांडे,सुनील पवार,उद्धव भालेकर,विठ्ठल पवार, राजू गाडे,महादेव धनवडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नाथ प्रतिष्ठानचा गणेशोत्सव साधेपणाने

## अजय मुंडे यांच्या हस्ते श्रींची स्थापना; तिरुपती बालाजी मंदिराचा देखावा

**परळी वै.। वार्ताहर**

**राज्याचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानचा गणेशोत्सव यावर्षी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने साजरा केला जात असून, युवा नेते अजय मुंडे यांच्या हस्ते सपत्नीक आज विधिवत श्रींची स्थापना करून आरती करण्यात आली.**



नाथ प्रतिष्ठानचा सार्वजनिक गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह सबंध देशात नावाजलेला उत्सव असतो, मात्र यावर्षी संपूर्ण बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात दुष्काळाचे सावट असल्याने कोणताही उत्सव साजरा न करता भाविकांसाठी आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिराचा हुबेहुब देखावा साकारण्यात आला आहे, या देखाव्याचे उद्घाटन आज सायंकाळी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. अगदी तिरुपती येथील बालाजी मंदिराप्रमाणे साकारलेल्या या भव्य देखाव्याला पाहण्यासाठी परळीतील भाविकांनी पहिल्याच दिवशी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. दरम्यान या दोनही प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, प्रतिष्ठित नागरिक तसेच नाथ प्रतिष्ठान चे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# धार्मिक परंपरा व सामाजिक ऐक्याचा संगम

## स्व.गोपीनाथ मुंडे गणेश मंडळात 'श्री' ची उत्साहात स्थापना; मान्यवरांच्या उपस्थितीत गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना

**आष्टी । प्रतिनिधी**

**सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाला एकत्र आणणारे, विधायक विचार रुजवणारे आणि संस्कृतीचे संवर्धन करणारे एक प्रभावी माध्यम आहे. याच सामाजिक बांधिलकीची आणि संस्कृतीची उज्ज्वल परंपरा जपत आष्टी शहरातील 'लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे गणेश मंडळा'ची यंदाही अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्थापना करण्यात आली.विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने संपूर्ण परिसरात भक्ती आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.या**




मंडळाच्या वतीने गणपती बाप्पाच्या मूर्तीची शास्त्रोक्त पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंगलप्रसंगी समाजसेवक तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार, ॲड.साहेबराव म्हस्के,ॲड. रत्नदीप निकाळजे,माजी नगरसेवक बाळासाहेब शिंदे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, महेश सहकारी साखर कारखान्याचे संचालक सदाशिव दिंडे,आबा तावरे, प्रा.गहिनीनाथ डोंगरे,इंजि.महेश सोनवणे,राजेंद्र लाड सर, इंजि. सोहम डोंगरे इंजि.सोहम डोंगरे,माजी सरपंच एम.डी. लटपटे,बापू गर्जे, प्राचार्य शाम शेकडे उपस्थित होते. प्रतिष्ठापनेनंतर इंजिनिअर सोहम डोंगरे यांच्या शुभहस्ते बाप्पाची आरती संपन्न झाली.यावेळी उपस्थित भाविकांनी केलेल्या 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून राष्ट्रजागृती व समाजप्रबोधनाचा जो विचार मांडला, त्याच विचारांवर मार्गक्रमण करत हे मंडळ लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या लोकसेवेच्या प्रेरणेतून कार्यरत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ धार्मिक विधी न करता, समाजातील तळागाळातील घटकांना उपयोगी पडतील असे विविध सामाजिक, प्रबोधनात्मक व लोकोपयोगी उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यास मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते,तरुण वर्ग, मुंडे भक्त आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

### सोयाबीनसह चार पिकांचे नव

'एमएयूएस ७९१' हा वाण महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. स्थानिक तसेच राष्ट्रीय तुल्यबळ वाणांच्या तुलनेत या वाणाचे उत्पादन अधिक असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. विविध कीड व रोगांना या वाणाची मध्यम प्रतिकारक्षमता असल्याचेही निष्पन्न झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात लागवडीसाठी 'एमएयूएस ७९१' या सोयाबीन वाणाचा प्रसार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सोयाबीनचे उत्पादन वाढविण्यासोबतच कीड-रोगांचा प्रादुर्भाव कमी ठेवण्याच्या दृष्टीने हा वाण शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकतो. आंब्याचा 'राजकेशर' वाण मराठवाड्यासाठी आंबा उत्पादकांसाठीही या बैठकीत महत्त्वाची शिफारस करण्यात आली आहे. या आंबा वाणाला 'राजकेशर' हे नाव देऊन मराठवाडा विभागात लागवडीसाठी प्रसारित करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या वाणाची नियमित फलधारणा होण्याबरोबरच लवकर फुलोरा आणि फलधारणा होते. पीक कालावधी तुलनेने कमी असून फळांचा रंग आकर्षक आहे. अधिक फळधारणा व उत्पादन, चवीला गोडपणा आणि अधिक काळ टिकवण क्षमता ही या वाणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील आंबा उत्पादकांसाठी 'राजकेशर' हा वाण नवीन पर्याय ठरू शकतो. लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी खरबूज उत्पादकांसाठी 'परभणी खरबूज' या वाणाचीही शिफारस करण्यात आली आहे. हा वाण अर्धवट जाळीदार, कुरकुरीत आणि फिकट नारंगी जाड गर असलेली एकसारखी लंबवर्तुळाकार फळे देतो. या वाणाचे उत्पादन अधिक असून लांब पल्ल्याच्या बाजारपेठेत विक्रीसाठी तो उपयुक्त असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. त्यामुळे मराठवाडा विभागात या वाणाच्या लागवडीसाठी प्रसार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. दुधी भोपळ्याच्या पिकासाठी 'परभणी दुधी भोपळा' या वाणाची शिफारस करण्यात आली आहे. मध्यम वाढीचा हा वाण असून त्याची फळे कडू नसतात. लांब, सरळ आणि एकसारखी दंडगोलाकार फळे या वाणाचे वैशिष्ट्य आहे. अधिक उत्पादन देण्याबरोबरच लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी हा वाण उपयुक्त असल्याचे आढळून आले आहे. मराठवाडा विभागात लागवडीसाठी या वाणाचा प्रसार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. याशिवाय कारली उत्पादकांसाठी 'परभणी कारली' हा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे. या वाणाची फळे गडद हिरव्या व चमकदार रंगाची असून मध्यम आकाराची असतात. दोन्ही टोकांना निमुळती असलेली आणि आकर्षक स्वरूपाची फळे या वाणाचे वैशिष्ट्य आहे. फळांवरील शिरा तुटक स्वरूपाच्या असून अधिक उत्पादन आणि लांब पल्ल्याच्या बाजारपेठेसाठी हा वाण उपयुक्त असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. मराठवाडा विभागात या वाणाच्या लागवडीसाठी प्रसार करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

-------------

### प्राण्यालाही लाज वाटेल असे सरकार

प्राण्यालाही लाजवेल अशा पद्धतीने मंत्र्यांची मान वाकत जाते, त्यामुळे जरांगे पाटलांना बादशहा झाल्यासारखे वाटते. सरकार झुकती है, झुकानेवाला चाहिये, त्यामुळे सरकार झुकते, त्यामुळे काय करायचे, हे सरकार आणि जरांगे बघतील,'' असे म्हणत वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला. गणेशोत्सवाच्या काळात जरांगे पाटील मुंबईला गेल्यास मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने आंदोलन कसे हाताळायचे, हा त्यांचा प्रश्न असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले. मात्र, सरकारने ओबीसी समाजाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. ओबीसी विरुद्ध हिंदू असा वाद निर्माण करण्याचे काम सरकारने केले आहे. ओबीसींवर आलेले संकट हे सरकारचे पाप आहे. ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्न गंभीर आहे. मोठ्या संख्येने असलेल्या लोकांना नोकऱ्यांमध्ये कमी जागांमध्ये सामावून घेतले जात आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न गंभीर असल्याचे ते म्हणाले. काही जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जागा ओबीसींच्या हातातून गेल्याचा दावा करत त्यांनी बोगस प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावर सरकारला घेरले. ओबीसीच्या नावावर प्रमाणपत्र घेऊन लोक निवडून येत असतील, तर ओबीसी सुरक्षित कुठे आहे? खोटे प्रमाणपत्र घेऊन निवडून येणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

-----------

### मराठा समाजाचा मोर्चा स्थगित

येऊ नका, असें म्हणतोय. वर्गण्या काढल्यात, गाड्या तयार ठेवल्यात, पण सांगतो की वर्गणी आणि गाड्यांना हात लावू नका, जशाच्या तशा ठेवा. गाड्या, पैसे योग्य कामास येणार आहेत. आता तुम्हाला तयारीला आणखी वेळ मिळाला आहे. ज्यानी दोन गाड्या तयार ठेवल्या असतील त्यांनी तीन गाड्या तयार ठेवा. , असे आवाहनही त्यांनी केले.

--------------

### हिवाळी अधिवेशनात समान

करत असून समितीचा अहवाल आल्यानंतर आम्ही ते लवकरात लवकर लागू करू, असा मला विश्वास आहे. राज्य सरकारने यूसीसीवर काम करण्यासाठी जुलैमध्ये स्थापलेल्या सातसदस्यीय समितीला सहा महिन्यांत शिफारशी सादर करण्यास सांगितले आहे. समितीच्या शिफारशी येताच सरकार याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू करेल. या समितीत न्या. देसाई यांच्याशिवाय उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण व एस. जी. मेहरे, माजी मुख्य सचिव डी. के. जैन, माजी ॲडव्होकेट जनरल वीरेंद्र सराफ, घटनातज्ज्ञ रमेश पतंगे आणि शिक्षणतज्ज्ञ सुवर्णा रावल यांचा समावेश आहे.

---------------

### 'एक गाव, एक गणपती' संकल्पनेतून

सुव्यवस्थेसाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला आहे. बीड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत यंदा एकूण १,७३८ सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना प्रस्तावित आहे. (मागील वर्षी ही संख्या १,५७७ इतकी होती). एक गाव, एक गणपती : सामाजिक सलोखा जपत सुमारे २९२ गावांमध्ये एकच गणपती बसवला जाणार आहे. मागील वर्षीही ही संख्या २९२ होती. प्रत्येक गणेश मंडळामध्ये प्रतिष्ठापनेच्या वेळी साधारण ३० ते ४० भाविकांपासून ते अगदी २०० ते ३०० पर्यंतचा जनसमुदाय उपस्थित राहण्याचा अंदाज आहे. उत्सवाला गालबोट लागू नये आणि भाविकांना सुरक्षित वातावरणात सण साजरा करता यावा, यासाठी जिल्हा पोलीस दलासह राज्य राखीव पोलीस बल सज्ज झाले आहे. एसआरपीएफ गट क्रमांक १०, सोलापूरच्या तीन प्लाटून अनुक्रमे बीड उपविभाग, माजलगाव उपविभाग आणि अंबाजोगाई येथे प्रत्येकी एक याप्रमाणे तैनात करण्यात आल्या आहेत. दंगल नियंत्रण पथक आष्टी आणि परळी येथे प्रत्येकी ०१ प्लाटून सज्ज ठेवण्यात आली आहे. पोलीस ठाण्यांच्या मदतीसाठी ७४६ पुरुष होमगार्ड आणि १२० महिला होमगार्ड बंदोबस्तावर रुजू झाले आहेत. याव्यतिरिक्त जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाकडून विशेष अतिरिक्त कुमक तैनात ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पारंपरिक उत्साहात, नियमांचे पालन करत आणि सामाजिक सलोखा जपत गणेशोत्सव शांततेत साजरा करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

-------------

### भाषा कोणतीही असो, भावना भारतीय असली

दिवस असल्याने हा मोठा योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले. विघ्नहर्ता गणराय भारतीय भाषांच्या विकासाचे मार्ग सुकर करतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी लोकमान्य टिळक यांना अभिवादन केले. गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप देण्याचे महत्त्वाचे कार्य लोकमान्य टिळक यांनी केले, असे शाह म्हणाले. राजभाषा सन्मान पुरस्कार प्राप्त झालेल्यांचे त्यांनी अभिनंदन केले. भारताची बहुभाषिक संस्कृती हीच देशाची ताकद आहे. अनेक भाषा एकत्र आल्या आणि त्यांचा मान-सन्मान झाला, ही भारताच्या संस्कृतीची विशेषता आहे. भारताच्या या बहुभाषिक संस्कृतीला माझा प्रणाम आहे, असे शाह यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विनोबा भावे यांच्या कार्याचेही स्मरण केले. मी गुजरातमधून आलो आहे. गुजरातमध्ये गुजराती भाषा बोलली जाते. मात्र, मला हिंदी येत असल्यामुळे राष्ट्रीय पातळीवर दिल्लीत काम करता आले. पक्षाने जबाबदारी दिल्यानंतर हिंदी समजत असल्याने मला कोणतीही अडचण आली नाही, असा अनुभव अमित शाह यांनी सांगितला. मातृभाषा अत्यंत महत्त्वाची असून, तिच्याशिवाय व्यक्तीला पुढे जाता येत नाही. मातृभाषेसोबत आणखी एक भारतीय भाषा शिकली, तर भारताचा सच्चा शिपाई बनता येईल, असे आवाहनही त्यांनी केले. भारत सरकार मराठीत लिहिलेल्या पत्रांचे स्वागत करते आणि त्यांचा इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद केला जातो, असेही अमित शाह यांनी स्पष्ट केले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली १३ भाषांमध्ये परीक्षा आयोजित करण्याचे काम करण्यात आले आहे. २०२९ पर्यंत सर्वात मोठा हिंदी भाषेचा शब्दकोश तयार केला जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. सर्व भारतीय भाषांचा सन्मान राखत हिंदीचा विकास करण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. काही लोक भाषेचे राजकारण करतात. त्यांना एवढेच सांगतो की, छोटा मुलगा आपल्या मातृभाषेतूनच देशाला पुढे नेऊ शकतो. सर्व भारतीय भाषांमध्ये हिंदी ही माध्यम वाणी बनून सर्वांना संबोधित करेल, असे शाह यांनी सांगितले. भाषा कोणतीही असो, भावना भारतीय असली पाहिजे. भारताची भाषा एक असली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

------------------

### पंढरीत भाविकांसाठी तीन

उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने या रासायनिक प्रक्रियेला हिरवा कंदील दाखविल्याने आता २२ सप्टेंबर रोजी शेजारतीनंतर भारतीय पुरातत्त्व विभाग आपल्या कामाला सुरुवात करणार आहे, अशी माहिती मंदिराचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली. पंढरीत वर्षाकाठी जवळपास अडीच ते तीन कोटी भाविक हे विठ्ठलाचे स्पर्श करून दर्शन घेत असल्याने मूर्तीची मोठ्या प्रमाणात झीज होत असते. मंदिर शासनाच्या ताब्यात आल्यापासून पहिले लेपन १९८८ मध्ये केले होते. त्यानंतर थोड्या थोड्या कालावधीने चार वेळेला विठ्ठल आणि रुक्मिणी मूर्तीवर लेपण करावे लागले होते. परंपरेत या लेपनाला 'वज्रलेप' असे म्हटले जाते. मात्र, सध्या पुरातत्त्व विभाग ज्या पद्धतीची शिफारस करतो, त्यात मान्यताप्राप्त आधुनिक रासायनिक संरक्षक लेप वापरला जातो. यात प्रामुख्याने इपॉक्सी राळ, दगडाची भुकटी आणि पाणी न झिरपणारे सिलिकॉन आधारित पदार्थ वापरले जातात, अशी माहिती भारतीय पुरातत्व विभागाचे निवृत्त उपसंचालक आणि रसायन तज्ज्ञ विलास पुनीराज यांनी दिली. लेपणाचा कालावधी हा भाविकांचा स्पर्श, अभिषेक आणि वातावरणावर अवलंबून असतो. पंढरपूरमध्ये यापूर्वी केलेले संरक्षणात्मक लेपन साधारण ५ ते ६ वर्षे व्यवस्थित राहिल्याचे अनुभव आहेत. त्यानंतर पुन्हा मूर्ती जिजल्यावर त्यावर नव्याने लेपन करावे लागते. पुरातत्त्व विभागाचे सांगण्यानुसार भारतामध्ये पुरातत्व विभाग ज्या मान्यताप्राप्त पद्धतीचा वापर करतो तीच पद्धत विठ्ठल मूर्तीवर देखील वापरण्यात येते. पुरातत्त्व विभाग वापरत असलेली रसायन हे देखील हर्बल म्हणजेच नैसर्गिक असून ते मान्यता प्राप्त असल्याने त्याचा वापर केला जात असल्याचा दावा केला आहे. सेध्या विठ्ठल मूर्तीच्या पायावर एक खड्डा पडला असून पाय पूर्ण झिजून गेले आहेत. याच पद्धतीने मूर्तीला अनेक ठिकाणी लेपनाची गरज भासत असून तातडीने ही प्रक्रिया राबविणे गरजेचे होते. त्यानुसार आता मंदिर समिती आणि प्रशासनाने भारतीय पुरातत्व विभागाच्या मदतीने ही रासायनिक लेपनाची प्रक्रिया करणार आहेत.

----------------

### घडलेल्या घटनांचे वृत्तांकन करणे

जनजागृती सामाजिक प्रश्न, अन्याय, आणि घडामोडींवर प्रकाश टाकून माध्यमं जनतेला जागरूक करतात. वृत्तसंकलनाचे स्वातंत्र्य कोणत्याही घटनेच्या ठिकाणी जाऊन माहिती गोळा करणे, फोटो किंवा व्हीडीओ काढणे आणि प्रत्यक्षदर्शींच्या मुलाखती घेणे हा वृत्तांकनाचा मुख्य भाग आहे. कायदेशीर चौकटीत राहून सार्वजनिक हिताच्या बातम्या मिळवण्यापासून माध्यमांना रोखता येत नाही.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोकजी सकपाळ बीड जिल्ह्यात प्रथम आले असता शिवसेनेचे बीड जिल्हा संघटक नितीन धांडे यांनी शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने स्वागत केले यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम,उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप,मराठा महासंघाचे माजी जिल्हाप्रमुख विठ्ठल काकडे, भूविकास बँकेचे माजी व्यवस्थापक कैलास वीर,माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे,शाखाप्रमुख शिवाजी तिपाले यांच्यासह बीड जिल्हा शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नवगण राजुरी: गणेश चतुर्थी निमित्त गजाननाला गंगेच्या पाण्याने जलाभिषेक घालण्यासाठी आलेल्या कावडीचे पूजन करताना आ. संदीप क्षीरसागर समवेत आचार्य अमृता श्रम स्वामी महाराज, उपसरपंच भगवान बहीर, अनिल बनकर आदि.

## सरपंच पांडुरंग नागरगोजे यांना 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' जाहीर

पाटोदा । प्रतिनिधी

रोहतवाडी (ता. पाटोदा, जि. बीड) येथील लोकनियुक्त माजी सरपंच तथा पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान उपसभापती मा. श्री. पांडुरंग दादाराव नागरगोजे यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मान २०२६' जाहीर झाला आहे.



रोहतवाडी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेत प्रशासन आणि ग्रामस्थांमध्ये उत्तम समन्वय साधत गावाच्या विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर करण्यात आला आहे.नागरगोजे यांच्या कार्यकाळात सुसज्ज ग्रामपंचायत इमारत, खडज अंगणवाडी, स्मशानभूमी विकास, घरोघरी नळजोडणी, 'घर तेथे शौचालय', पारदर्शक व गतिमान ग्रामपंचायत कारभार तसेच विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. शिक्षण क्षेत्रात सुसज्ज शाळा उभारणीसाठी तसेच आरोग्य क्षेत्रात कोविड-१९ काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याचीही विशेष दखल घेण्यात आली आहे.याशिवाय सरपंच सेवा संघटनेच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. ग्रामविकासाच्या विविध योजनांची माहिती देत सरपंचांना प्रशासनाशी समन्वय साधण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या कार्याची दखल घेत स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या गौरव समितीने त्यांची राज्यस्तरीय आदर्श सरपंच सन्मानासाठी निवड केली आहे. हा राज्यस्तरीय गौरव सोहळा स्वराज्य सरपंच सेवा संघाचे संस्थापक व चळवळीचे नेते बाबासाहेब पावसे पाटील तसेच प्रदेशाध्यक्ष मा. रोहित संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणार आहे. शिरडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे यांच्या शुभहस्ते, तसेच मा. यादवराव पावसे पाटील व मा. रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे.

# पोकलेन मशीनचे रॉक ब्रेकर चोरणारी टोळी जेरबंद
# ८ लाखांचा मुद्देमाल जप्त, ७ आरोपींना अटक

**गेवराई । प्रतिनिधी**

कल्याण ते विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ च्या कामावरील पोकलेन मशीनचे तब्बल ८ लाख रुपयांचे रॉक ब्रेकर चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा गेवराई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी टोळीतील ७ आरोपींना गजाआड केले असून त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे.



गेवराई पोलीस ठाण्यांतर्गत मादळमोही चौकीच्या हद्दीत ' इन्फ्रा' कंपनीमार्फत राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू होते. या कामावर फिर्यादीचे कोबेल्को कंपनीचे २२० मॉडेलचे पोकलेन मशीन कार्यरत होते. मादळमोही येथील एचपी पेट्रोल पंपासमोर लावलेले '' कंपनीचे ८ लाख रुपये किमतीचे रॉक ब्रेकर (मॉडेल क्र. २२०२३१-३०२४) अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री चोरून नेले होते. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ५२०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांनी गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाचा प्रभावी वापर करत धागेदोरे शोधून काढले. या तपासाअंती पोलिसांनी गेवराई तालुक्यातील ७ आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली. ज्ञानोबा किसन काळे (वय ४७, रा. राजपिंप्री, ता. गेवराई) अमोल अंकुश पवार (वय २८, रा. संजय नगर, गेवराई)सोमेश्वर मनोहर शेंडगे (वय ३८, रा. म्हाडा कॉलनी, गेवराई)दत्तात्रय नारायण जाधव (वय ३६, रा. राजपिंप्री, गेवराई)किशोर लहू खंडागळे (वय ३०, रा. कोल्हेर रोड, शिवाजीनगर, गेवराई) रामेश्वर दिलीप पांगरे (वय २७, रा. कुंबेजळगाव, ता. गेवराई)नामदेव भगवान जाधव (वय ५०, रा. राजपिंप्री, ता. गेवराई) यांना अटक करण्यात आलीपोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेले ८ लाख रुपयांचे रॉक ब्रेकर हस्तगत केले असून आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत. अनेक जिल्ह्यांत गुन्हे दाखल; आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यताअटक करण्यात आलेल्या आरोपींवर यापूर्वीही अशाच प्रकारे पोकलेन मशीनचे ब्रेकर चोरी केल्याप्रकरणी जिंतूर (जि. परभणी), वडवणी (जि. बीड) आणि बिडकीन (जि. छत्रपती संभाजीनगर) या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. आरोपींच्या पोलीस कोठडीदरम्यानच्या चौकशीतून आणखीही मोठे गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि अतुलकुमार लांडगे करत आहेत.सदर धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि अतुलकुमार लांडगे, पोउपनि राजाभाऊ गर्जे, पोलीस अंमलदार त्रषी पोटे, विजय परजणे, संजय गुजर, कल्याण राठोड, शेखर हिंगावर, नारायण सरवदे, महादेव कदम व देवडे यांनी पार पाडली.

## वडवणीत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

### डीजेवर बंदी ; पारंपरिक वाद्यांना परवानगी - मिरवणुका, सोशल मीडिया अन् सुरक्षेबाबत पोलिसांच्या सूचना

वडवणी । प्रतिनिधी

गणरायाच्या आगमनाला अवघे काही तास शिल्लक असताना वडवणी तालुक्यात गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि आनंदात पार पडावा, यासाठी वडवणी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. एपीआय वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत गणेश मंडळांना विविध महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.



गणेश आगमन व विसर्जन मिरवणुका, मिरवणुकीचे मार्ग, गणेशमूर्तींची सुरक्षितता, स्वयंसेवकांची भूमिका, महिला व लहान मुलांची सुरक्षा, मिरवणुकीदरम्यान वापरण्यात येणारी वाद्ये, मिरवणुकीची वाहने तसेच सोशल मीडियावर करण्यात येणाऱ्या पोस्ट याबाबत पोलिस प्रशासनाच्या वतीने सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यात डीजे बंदी कायम राहणार असून पारंपरिक वाद्यांना परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या अनुषंगाने संबंधित गणेश मंडळांकडून हमीपत्रही घेण्यात येणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली. गणेशोत्सव काळात चएउइ तसेच स्थानिक प्रशासनाशी संबंधित कोणत्याही अडचणी उद्भवल्यास पोलीस प्रशासनाकडून समन्वय साधण्यात येईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. तसेच गणेश मंडळांनी उत्सवाच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक संदेश देणारे उपक्रम राबवावेत, असे आवाहन करण्यात आले. बालविवाह प्रतिबंध, स्त्री शिक्षण, रक्तदान, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण यांसारख्या सामाजिक विषयांवर आधारित देखावे तसेच विविध जनजागृतीपर स्पर्धांचे आयोजन करण्याचे आवाहनही पोलिस प्रशासनाने गणेश मंडळांना केले. दरम्यान, गणेशोत्सव काळात कोणताही संवेदनशील प्रसंग किंवा अनुचित घटना घडल्यास त्याची माहिती तात्काळ पोलिस प्रशासनाला द्यावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. या बैठकीस वडवणी पोलीस ठाण्याचे झडख शाम गायकवाड, तालुक्यातील सर्व पोलीस पाटील, विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते. गतवर्षीप्रमाणे यंदाही वडवणी तालुक्यात गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि आनंदात पार पडेल, असा विश्वास पोलीस प्रशासनासह गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## अंतरवाली सराटी येथे ॲड.आनंद काळे यांच्या वतीने ७ क्विंटल खिचडीचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

मराठा समाजाचे संघर्ष युद्धे मनोज दादा जरांगे पाटील यांनी शनिवार दि १२ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथे येण्याचे आव्हान केले होते त्यांच्या हाकेला ओ देत लाखोंच्या जनसमुदाय येथे लोटला होता.तिथे आलेल्या सर्व समाज बांधवांना मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्यात आले होते. यात युवा नेते ऍड आनंद भैया काळे यांनीही खारीचा वाटा उचलला त्यांनी ७ क्विंटल पुलाव खिचडीचे लोणचे वाटप करण्यात आले आहे.त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



गोरगरीब मुस्लीम, मराठा,धनगर,ओ बी सी अदी समाज आपल्या न्याय हक्कासाठी रस्त्यावरची लढाई लढत असतो त्या सर्व समाज बांधवांच्या लढ्यात सक्रिय सहभागी होऊन त्या समाजबांधवांचे मोर्चे,निदर्शने,रास्ता रोको अदी समाज बांधवांना नाश्ता,खिचडी,पाणी बॉटल,सढळ हाताने मदतीचा हात म्हणुन सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन चालणारे युवा नेतृत्व अँड आनंद भैय्या काळे सतत अग्रेसर आसतात.अंतरवाली सराठी येथे गेली पंधरा दिवस झाले मराठा समाजाचे संघर्ष योध्दे मनोज दादा जरांगे पाटील मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी आपल्या जीवाची परवा न करता अन्नपाणी त्याग करून प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत.मुंबईला जाण्याच्या नियोजना संदर्भात शनिवारी बैठक घेण्यात आली होती.या बैठकीला लाखोंचा जनसमुदाय अंतरवाली सराठी या ठिकाणी दाखल झाला होता.त्या समाज बांधवांना मोठ्या प्रमाणात जेवणाची पाण्याची सोय करण्यात आली होती.यामध्ये वडवणी तालुक्यातील चिंचाळा गावचे युवा नेतृत्व अँड आनंद भैय्या काळे यांनी त्यांच्या सहकर्या सोबती घेऊन ७ क्वींटलची पुलाव खिचडी लोणचे वाटप करण्यात आले.



## प्रा. डॉ. संतोष रणखांब यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील रहिवासी व कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ येथे कार्यरत असणारे प्रा.डॉ.संतोष रणखांब यांची प्रोफेसर पदी पदोन्नती झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. मोठीवाडी येथील भुमिपुत्र सोनपेठ येथील कै.रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत असणारे प्रा.डॉ. संतोष वसंतराव रणखांब यांनी २०११ ते २०२६ या कालावधीत सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक म्हणून उत्कृष्ट कार्य केले, त्यांनी केलेल्या कामाचे विद्यापीठाच्या निवड समितीद्वारे मुलाखती घेऊन मूल्यमापन केले, या मूल्यमापन समितीच्या अहवालानंतर त्यांना प्राध्यापक (प्रोफेसर) म्हणून पदोन्नती देण्यात आली.

या त्यांच्या पदोन्नती बद्दल गावकऱ्यांच्या वतीने, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संभाजी चव्हाण, उपसरपंच अंगद खेत्री, ग्रा. पं. सदस्य ज्ञानेश्वर खेत्री, मा.चेअरमण अशोक पाष्टे, पत्रकार राजाभाऊ पास्टे, दत्तात्रय चव्हाण, मा. उपसरपंच दत्तात्रय तपसे, सुदर्शन हिवरकर, प्रभाकर खेत्री, मदन गोंगाणे यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

## पावसाअभावी आष्टी, पाटोदा, शिरूर कासार तालुक्यांतील खरीप पिके वाया; शेतकऱ्यांवर अस्मानी संकट

### सुरेश धस जिवंत आहे शेतकऱ्यांनी घाबरू नये – आ. सुरेश धस यांची ग्वाही

आष्टी । प्रतिनिधी

पावसाळा संपत आला असतानाही आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांत खरीप हंगामातील पिके पावसाने पाठ फिरवल्याने वाया गेली असून, शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढवले आहे.या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.तर शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये सुरेश धस जिवंत असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही हेक्टरी अनुदान मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही आ. धस यांनी दिली.

आष्टी तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात एकूण ९७ हजार ७६७ हेक्टर क्षेत्रापैकी ६८ हजार ५५० हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली ज्यामध्ये या वर्षी सोयाबीन ३८ हजार हेक्टर, उडीद १७ हजार हेक्टर, मूग १ हजार ९०० हेक्टर,मका ८ हजार हेक्टर,बाजरी ६ हजार ३०० हेक्टर, कापूस ५ हजार ५०० हेक्टर तूर १५ हजार ५०० हेक्टर या प्रमाणे तसेच पाटोदा तालुक्यामध्ये एकूण ५८ हजार ९१३ हेक्टर क्षेत्रात सोयाबीन ५१ हजार ४८७ हेक्टर, तूर २ हजार ९७४ हेक्टर,उडीद १ हजार ५९५ हेक्टर, कापूस १ हजार ५९७ हेक्टर, बाजरी १२६० हेक्टर तर शिरूर कासार तालुक्यात ४७ हजार ५४४ हेक्टर क्षेत्रामध्ये सोयाबीन ७ हजार २४० हेक्टर, कापूस २९ हजार, २०२ हेक्टर, उडीद २ हजार ३९२ हेक्टर, मूग ७८६ हेक्टर,



बाजरी १ हजार ५०९ हेक्टर, मका ५५७ हेक्टर, तूर ५ हजार ७४६ हेक्टर क्षेत्रातील पेरणी झालेली आहे मात्र पावसाअभावी आष्टी पाटोदा शिरूर कासार तालुक्यातील सर्व पिके वाया गेली असून येथील फळबागा वाचवण्यासाठी फळबाग धारक शेतकऱ्यांची फळबागांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी अनुदान देण्याची मागणी समोर येत आहे.

तिन्ही तालुक्यांमध्ये सोयाबीन, मूग, उडीद, मका, कापूस,बाजरी,आणि तूर या प्रमुख खरीप पिके पावसाअभावी वाया गेल्याने पेरणीसाठी केलेला खर्चही वसूल होण्याची परिस्थिती राहिली नसल्याचे चित्र आहे.

### शेतकऱ्यांनी घाबरू नये; सरसकट हेक्टरी अनुदान मिळवून देऊ आ. सुरेश धस

दरम्यान, २० ते ३० सप्टेंबरदरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मात्र, पावसाने पाठ फिरविल्याने शेतकऱ्यांनी हतबल होऊन इतरत्र कामाला जाण्याचा विचार करू नये. आता कसं होईल, काय होईल, या चिंतेत शेतकऱ्यांनी राहू नये. सुरेश धस जिवंत आहे. शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. जे हेक्टरी अनुदान मिळेल, ते सरसकट मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. विनाकारण मनात भीती बाळगू नका, असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले आहे.शेतकऱ्यांनी संकटाच्या काळात धीर न सोडता पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाकडून शेतकऱ्यांना हेक्टरी अनुदान मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाहीही आ. धस यांनी दिली.

### जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर!

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांत पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याने त्याचा थेट परिणाम जनावरांच्या चाऱ्यावर झाला आहे. दुभत्या जनावरांची संख्या अधिक असलेल्या तसेच जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हिरवा चारा आणि कडबा उपलब्ध होत नसल्याने पशुपालकांची चिंता वाढली आहे. दुग्ध व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने चारा डेपो सुरू करून पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

## पान ६ वरुन...

### आष्टीच्या गणेशोत्सवाची

सांगितले. आमदार धस यांच्या गणेशमूर्तीच्या स्थापनेचा क्रमांक २०३३ साली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**लोप पावत चाललेली आरास आणि पारंपरिक उत्सवाची गरज**

काही वर्षांपूर्वी आष्टी शहरातील गणेश मंडळांकडून विविध सामाजिक, ऐतिहासिक आणि प्रबोधनात्मक विषयांवर आकर्षक आरास व देखावे सादर केले जात होते. मात्र कालांतराने ही परंपरा हळूहळू लोप पावत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. तसेच आष्टीतील गणेश विसर्जन मिरवणुकीत नर्तिकांना सहभागी करून घेण्याचीही एकेकाळी परंपरा होती. मात्र तत्कालीन बीड जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्र सेनगावकर यांच्या काळात ही प्रथा बंद करण्यात आली.

**'डीजे'पेक्षा पारंपरिक वाद्यांचा गजर करा : सुरेश धस**

गणेशोत्सवाचा उत्साह वाढविताना कर्णकर्कश आवाज करणाऱ्या डीजेचा अतिरेक टाळून पारंपरिक वाद्यांचा गजर, ढोल-ताशे आणि सांस्कृतिक परंपरांना प्राधान्य द्यावे, असा संदेश आमदार सुरेश धस यांनी दिला आहे. गणेशोत्सव हा भक्ती, संस्कृती, सामाजिक एकोपा आणि परंपरेचा उत्सव आहे. त्यामुळे आष्टीच्या शतकाहून अधिक जुन्या गणेशोत्सवाच्या वैभवाला साजेसे आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारे उत्सव साजरे करण्याची गरज आहे.

शतकाहून अधिक काळाची परंपरा, नवसाची श्रद्धा आणि सर्वधर्मीयांचा सहभाग यामुळे आष्टीचा गणेशोत्सव आजही आपली स्वतंत्र ओळख जपून आहे. दुसऱ्या फोटोमध्ये आमदार सुरेश आण्णा धस यांच्या निवासस्थानी अद्वेदचंद या ठिकाणी गणेशाची स्थापना करताना प्राजक्ता ताई धस, युवा नेते जयदत्त धस सागर आप्पा धस , गौरीताई सागर धस ऐश्वर्या ताई जयदत्त धस नातु विश्वराज,परी आदी..

### माजलगाव धरणाची उंचीवाढ

गावांचे संयुक्त सर्वेक्षण करून संभाव्य बुडीत क्षेत्र स्पष्ट करावे. तसेच शेतकऱ्यांची जमीन बाधित होणार नाही, याची शासनाने स्पष्ट व लेखी हमी द्यावी, अशी मागणी बदामराव पंडित यांनी केली आहे. तसेच संबंधित शेतकरी व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन त्यांना विश्वासात घ्यावे. शेतकऱ्यांची जमीन वाचविण्यासाठी गाळ काढणे अथवा अन्य पर्यायी उपायांचा शासनाने विचार करावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या शेतकऱ्यांनी विकासासाठी एकदा त्याग केला आहे. त्यांच्यावर पुन्हा विस्थापनाची वेळ येऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करत पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी या प्रश्नात स्वतः लक्ष घालून २३ पुनर्वसित गावांतील शेतकऱ्यांना न्याय द्यावा व त्यांच्या मनातील भीती दूर करावी, अशी विनंती केली आहे.

### डॉ. ओमप्रकाश शेटेंच्या निवासस्थानी

वापर करण्यात आला आहे. त्यामुळे विसर्जनानंतर त्या ठिकाणी तुळशीचे रोप उगवणार असून 'मातीतून आला, मातीत मिसळला' हा खरा पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजात जात आहे.

डॉ. शेटे यांच्या या पर्यावरणपूरक निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांनी 'विकास हीच जात, विकास हाच धर्म' या विचारासोबतच 'पर्यावरण हाच देव' हा नवा संदेश दिला आहे. यावेळी खोलेश्वर मल्टीस्टेट चे विलास पारेकर, हभप दशरथ महाराज तिडके, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, संतोष स्वामी, नागेश वखरे, नागेश कानडे, नाथा हंगरगे, राम ढोरमारे आदी उपस्थित होते.

गणपती बाप्पा आपल्याला निसर्गाशी जोडतो. पीओपीच्या मूर्तींमुळे नदी, तलाव प्रदूषित होतात. आपण जर शाडू मातीचा किंवा गोमयाचा गणपती बसवला, तर आपण खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे रक्षण करतो. माझ्या सर्व कार्यकर्त्यांना आणि जनतेला माझे आवाहन आहे की, यंदा पर्यावरणपूरक गणपती बसवून एक आदर्श निर्माण करूया. - डॉ. ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष, आयुष्मान भारत मिशन, महाराष्ट्र समिती)

### परळीतील घणशी व ब्रह्मगंगा

मयंक गांधी हे जलसंवर्धनाच्या क्षेत्रातील आपल्या अनुभवातून परळीकरांना मार्गदर्शन करणार असून, नदी पुनर्जीवनाच्या कार्यात नागरिकांचा सक्रिय सहभाग कसा वाढवता येईल, याबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे. या बैठकीस पर्यावरणप्रेमी, सामाजिक व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, युवक, जलसंवर्धन कार्यकर्ते आणि नदी पुनर्जीवनासाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### सावरलेल्या पुनर्वसित शेतकऱ्यांना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार यांच्यासह बीड जिल्हाधिकारी आणि जिल्हयातील लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती दत्ता कांबळे यांनी दिली.

सरकारने गाळ काढण्याचा पर्याय निवडून दिलासा द्यावा

माजलगाव धरणाच्या उंचीवाढीच्या सरकारी निर्णयामुळे पुनर्वसित शेतकरी पुन्हा उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. यात तिळमात्र शंका नाही. धरणाची उंची वाढविण्यापेक्षा गाळ काढून धरणाची खोली वाढवून सुद्धा अतिरीक्त पाणीसाठा साठवता येवू शकतो. त्यासाठी सरकारने याबाबत गांभीर्याने विचार करण्याची खरी गरज आहे. दरम्यान, संघर्ष युवा शेतकरी समिती आणि पुनर्वसन शेतकऱ्यांच्या वतीने पुकारलेल्या माजलगाव धरणात जलसमाधी आंदोलनाला पाठिंबा असल्याचे दत्ता कांबळे यांनी जाहीर केले.

### निष्काळजी वाहनचालना

(अ), १२५(ब) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १३४ व १७७ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**साक्षीदारांची साक्ष ठरली अपुरी** : न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी विविध साक्षीदार तपासले. मात्र, साक्षीदारांच्या जबाबातून आरोपीचा गुन्हा ठोसपणे सिद्ध होऊ शकला नाही. त्यामुळे आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध करण्यास सरकार पक्ष अपयशी ठरल्याचे न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट झाले.आरोपीच्या वतीने ड. नितीन एस. वेदपाठक यांनी मांडलेला बचाव, तसेच केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. त्यानंतर मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांनी आरोपीची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली.या प्रकरणात आरोपीच्या वतीने ड. नितीन एस. वेदपाठक यांनी काम पाहिले, तर त्यांना ड. ऐश्वर्या एल. दीक्षित यांनी सहकार्य केले.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६
४

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या थकीत कांदा पेमेंटसाठी शरद पवारांचा पुढाकार

## २ कोटी २५ लाखांचा प्रश्न मार्गी लागणार





पुणे : कर्नाटकातील एपीएमसी मार्केटमधील व्यापाऱ्यांकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे थकीत असलेले कांद्याचे तब्बल २ कोटी २४ लाख ९५ हजार १२१ रुपये मिळवून देण्यासाठी ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे.

शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन पवार यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत थकीत कांदा पेमेंट तातडीने मिळवून देण्याची विनंती केली. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील तांदळी येथील शेतकरी नानासो बाबासो कळसकर तसेच त्यांचे सहकारी नवनाथ खशाबा थोरात, गोरख गणपत गदादे आणि गणेश गणपत गदादे यांची कर्नाटकातील एपीएमसी मार्केटमधील व्यापाऱ्यांकडे कांदा विक्रीची मोठी रक्कम थकीत आहे. तब्बल २ कोटी २४ लाख ९५ हजार १२१ रुपयांचे पेमेंट अडकून राहिल्याने संबंधित शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणाची माहिती घेतल्यानंतर बारामतीचे शेतकरी प्रल्हाद वरे यांनी शरद पवार यांची भेट घेतली.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कर्नाटकातील एपीएमसी व्यापाऱ्यांकडे अडकलेले कांद्याचे पैसे मिळवून देण्यासाठी हस्तक्षेप करावा, अशी विनंती त्यांनी पवार यांच्याकडे केली. शेतकऱ्यांची अडचण समजून घेत पवार यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घातले. त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कांदा पेमेंट कर्नाटकातील एपीएमसीमधील व्यापाऱ्यांकडे थकीत असून, हे पैसे शेतकऱ्यांना लवकरात लवकर मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी विनंती त्यांनी केली. यापूर्वीच्या भेटीदरम्यानही पवार यांनी या विषयासंदर्भात कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना इंग्रजी भाषेत पत्र पाठविले होते. दरम्यान, नानासाहेब कळसकर व त्यांचे सहकारी शेतकरी बेंगळुरू येथील एपीएमसी मार्केटमध्ये गेले असता, त्याच वेळी कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी एपीएमसी मार्केटमध्ये आले होते. यावेळी कळसकर यांनी शरद पवार यांनी पाठविलेले पत्र मुख्यमंत्र्यांना दाखविले. पत्राची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्री शिवकुमार यांनी संबंधित शेतकऱ्यांना ''तुमचे पैसे लवकरात लवकर मिळवून देण्याची व्यवस्था करतो,'' असे आश्वासन दिले.

### शेतकऱ्यांना दिलासा

शरद पवार यांनी थेट कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधल्याने शेतकऱ्यांना थकीत पेमेंट मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. ''शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशासाठी शरद पवार यांनी थेट कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला, ही आमच्यासाठी मोठी बाब आहे. आता आमचे थकीत कांदा पेमेंट लवकरात लवकर मिळेल, अशी आशा आहे.

# गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत.

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत. गाईच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे म्हशीचे दूध गाईच्या दुधापेक्षा जाड असते. म्हशीची मुऱ्हा ही जात जास्त दूध देणारी जात मानली जाते. देशातील मोठ्या संख्येने पशुपालक ते पाळतात आणि चांगला नफाही मिळवतात. याशिवाय या म्हशीची दूध देण्याची क्षमताही इतर जातींपेक्षा जास्त आहे. मुर्रा जातीच्या म्हशीचा रंग काळा असतो. याशिवाय त्याची शिंगेही वक्र असतात. मुर्राह म्हशीचे डोके लहान आणि लांब शेपूट असते. तसेच त्याचा मागील भाग चांगला विकसित झाला आहे. या म्हशीच्या डोक्यावर, शेपटीवर आणि पायावरही सोनेरी रंगाचे केस आढळतात. मुऱ्हा म्हशीचा गर्भधारणा कालावधी सुमारे ३१० दिवसांचा असतो. त्याची नीट काळजी घेतल्यास ही म्हैस दररोज २० ते ३० लिटर दूध देते. पशुपालकांनाही या म्हशीच्या दुधाला चांगला भाव मिळतो. मुऱ्हा म्हशीच्या दुधाच्या किमतीबद्दल बोलायचे झाले तर त्याची किंमत बाजारात चांगली आहे. या म्हशीची किंमत ५० हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आहे. हिचे डोके लहान असते. त्याच्या शरीराच्या अनेक भागांवर सोनेरी केस असतात. ती दिवसाला २० लिटर दूध देते. यामुळे शेतकऱ्यांसाठी ही म्हैस फायदेशीर आहे. यामुळे शेतकऱ्यांना दूध व्यवसाय करण्यासाठी याचा फायदा होणार होतो.



# संकरित भेंडीच्या लागवडीस अनुकूल जाती



अर्का निकिता जीएमएस आधारित भेंडीचा पहिला संकरित वाण आहे जो भारत आणि जगातील सार्वजनिक संस्थांनी विकसित केला आहे. ही भेंडीची संकरित जात २०१७ मध्ये व्हिटीआयसी संस्थेने शोधून प्रसारित केलेली आहे.

लवकर फुलधारणा होणाऱ्या या जातीत फुले येण्यासाठी ३९ दिवस आणि फळे येण्यासाठी ४३ दिवस लागतात. या जातीची फळे गडद हिरवी, मध्यम, गुळगुळीत आणि कोवळी असतात. या जातीत पौष्टिकदृष्ट्या जास्त अँटिऑक्सिडेंट आणि उच्च दर्ज्याचे फायबर (८.८५%) असतात. यात पोटॅशियम ३.७%, कॅल्शियम ९९७ /१०० ग्रॅम सारखे खनिजे आहेत. ही जात १२५-१३० दिवसांच्या कालावधीत तोडणीला तयार होत असून उत्पादन २१-२४ टन मिळते. अर्का निकिता ही भेंडीची जात उच्च उत्पादकता आणि शेतीसाठी अनुकूलता यासाठी ओळखली जाते. पारंपारिक शेती पद्धतींसह आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड याद्वारे या जातीचे लक्षणीय उत्पादन घेता येते. अर्का निकिता ही भेंडीची जात तिच्यातील अपवादात्मक गुणधर्मांसाठी ओळखली जाते जसे, उच्च उत्पन्न, रोग प्रतिकारशक्ती आणि विविध हंगामात आणि प्रदेशांमध्ये लागवडीस अनुकूलता.

अर्का निकीता भेंडीची प्रमुख वैशिष्ट्ये : उच्च उत्पादन - अर्का निकिता प्रति हेक्टर २१-२४ टन इतके प्रभावी उत्पादन देते. या उच्च उत्पादकतेमुळे शेतकर्यांसाठी जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी एक चांगली निवड ठरते. फळांची गुणवत्ता - या संकरीत भेंडीची फळे गडद हिरवी, गुळगुळीत पाच कड्यांची असतात. यामुळे ही भेंडी दिसायला आकर्षक तर आहेच शिवाय काढणीस सोपी आहे. कोवळी फळे यामुळे या जातीला बाजारभाव सुद्धा चांगला मिळतो. अनुकूलता - अर्का निकिता विविध प्रकारच्या परिस्थितीत लागवडीसाठी योग्य आहे. या जातीची खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) दोन्ही हंगामात लागवड करता येते.

ही जात कर्नाटक, आंध्र प्रदेश, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, हरियाणा, महाराष्ट्र आणि अंदमान आणि निकोबार बेटांसह संपूर्ण भारतातील प्रमुख भेंडी-उत्पादक प्रदेशांसाठी अनुकूल आहे. रोग सहनशील - ही संकरित जात भेंडी पिकातील हानिकारक यलो व्हेन मोझॅक व्हायरस या रोगास सहनशील आहे. त्यामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ होऊन दर्जा सुद्धा वाढतो.

# गिलके : फायदेशीर भाजीपाला व्यवसाय



गिलके ही उन्हाळी आणि पावसाळी हंगामातील एक अत्यंत फायदेशीर भाजीपाला पिकाची लागवड आहे. कमी खर्चात आणि कमी कालावधीत हे पीक चांगले उत्पन्न देते.

हवामान आणि जमीन : हवामान: गिलके हे प्रामुख्याने उष्ण आणि दमट हवामानात चांगले वाढणारे पीक आहे. कडक थंडी या पिकाला सोसत नाही. जमीन: मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन (सामू ६.५ ते ७.५) या पिकासाठी उत्तम मानली जाते.

लागवडीचा हंगाम : उन्हाळी हंगाम: जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत लागवड करावी. पावसाळी हंगाम: जून ते जुलै महिन्या दरम्यान लागवड पूर्ण करावी.

सुधारित जाती : चांगल्या उत्पादनासाठी खालील जातींची निवड करावी: पुसा चिकनी: ही अतिशय लोकप्रिय जात असून हिची फळे मऊ आणि हिरवी असतात. फुले कोमल: महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेली ही जात असून अधिक उत्पादन देते. काही नामांकित कंपन्यांचे हायब्रीड (संकरित) वाण: बाजारात जास्त मागणी असणारी आणि लवकर येणारी संकरित बियाणे देखील तुम्ही निवडू शकता.

लागवड पद्धत आणि बियाणे प्रमाण : बियाणे प्रमाण: एक एकर क्षेत्रासाठी साधारणपणे १ ते १.५ किलो बियाणे पुरेशी होते. लागवडीचे अंतर: पावसाळी हंगामात वेलींची वाढ जास्त होते, त्यामुळे दोन ओळींत ५ ते ६ फूट आणि दोन वेलींत २ फूट अंतर ठेवावे. लागवड करताना एका ठिकाणी २ बिया टोकाव्यात.

खत आणि पाणी व्यवस्थापन : खत व्यवस्थापन: जमिनीची मशागत करतानाच भरपूर प्रमाणात शेणखत मिक्स करावे. लागवडीच्या वेळी रासायनिक खतांचा (नत्र, स्फुरद, पालाश) शिफारशीत डोस द्यावा. पाणी व्यवस्थापन:उन्हाळ्यात जमिनीच्या मगदुराप्रमाणे ४ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पावसाळ्यात पाणी देण्याची गरज नसते, मात्र शेतात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. ठिबक सिंचनाचा वापर केल्यास पाण्याचा योग्य वापर होतो.

वेलींना मांडव करणे : पावसाळी हंगामात गिलक्याचे पीक घेताना वेली जमिनीवर न सोडता बांबू आणि तारांच्या साहाय्याने मांडव (मंडप पद्धत) करून त्यावर चढवाव्यात. यामुळे फळे जमिनीला टेकत नाहीत, त्यामुळे ती सडत नाहीत. फळांचा रंग आणि आकार चांगला राहतो, ज्यामुळे बाजारात चांगला भाव मिळतो. कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो.

कीड व रोग नियंत्रण : कीड: प्रामुख्याने लाल भोगा आणि फळमाशीचा त्रास होतो. फळमाशीसाठी शेतात मक्षिका सापळे लावावेत. रोग: भुरी आणि केवडा या रोगांचा प्रादुर्भाव पानावरांवर होतो. यासाठी कृषी सेवा केंद्राच्या सल्ल्याने योग्य बुरशीनाशकाची फवारणी करावी.

काढणी आणि उत्पादन : लागवडीनंतर साधारणपणे ४५ ते ५० दिवसांत गिलके काढणीस तयार होतात. फळे कोवळी आणि मऊ असतानाच त्यांची तोडणी करावी, कारण ती जून (जास्त पिकल्यास) झाल्यास आत धागे तयार होतात आणि बाजारात किंमत मिळत नाही. दर २ ते ३ दिवसांनी तोडणी करावी. योग्य व्यवस्थापन केल्यास एका एकरातून ५० ते ७० क्विंटल पर्यंत उत्पादन मिळू शकते.

# दिन विशेष

## जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊद्रू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्ट्पैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्या व अधिक उत्पादन देणार्या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.१५ सप्टेंबर २०२६




# ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे थाटात आगमन

## ’श्रीं ’ची उत्साहात झाली प्रतिष्ठापना ; भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे संकट दूर करून बळीराजाला सुखी करण्यासाठी केली प्रार्थना

मुंबई

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे आज मोठ्या थाटात वाजतगाजत आगमन झाले. ना. पंकजाताई मुंडे व कुटूंबियांनी श्रींची उत्साहात प्रतिष्ठापना केली.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या निवासस्थानी दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीची प्रतिष्ठापना केली जाते. स्वतः पंकजाताई मुंडे या उत्सवाची सर्व तयारी करतात. गणपतीची मुर्ती आणण्यापासून ते त्याची स्थापना करण्यापर्यंत त्या स्वतः बारकाईने लक्ष घालतात, यावर्षी त्यांनी गणपतीची आरास अतिशय आकर्षक व सर्वांचे लक्ष वेधून घेणारी केली आहे. सकाळी ढोल ताशांच्या निनादात गणरायाचे आगमन झाले, त्यानंतर विधीवत पूजनाने ना. पंकजाताई मुंडे, त्यांचे कुटूंबिय उपस्थित होते. बाप्पाने प्रत्येक संघर्षावर मात करून पुढे जाण्यासाठी शक्ती दिलीय. यापुढील काळात देखील सामान्य माणसासाठी, वंचितासाठी सातत्याने काम करता यावं एवढी शक्ती मला मिळावी अशी प्रार्थना आपण बाप्पाकडे केली असल्याचं ना. पंकजाताई मुंडेंनी सांगितलं. पर्जन्यमान कमी झाल्याने मराठवाड्यासह राज्यातील बहुतांश भागात दुष्काळाची परिस्थिती आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. अशा स्थितीत भरपूर पाऊस पडू दे, दुष्काळाचे संकट दूर करून बळीराजाला सुखी कर अशी प्रार्थना त्यांनी केली. मी आता पर्यावरण मंत्री असले तरी फार पूर्वीपासून माझ्या घरी मी मातीचीच गणपती मूर्ती आणते. पर्यावरण पूरक गणेशाची स्थापना करा आणि वायू प्रदुषण, ध्वनी प्रदूषण आणि जल प्रदूषण टाळा असं आवाहन त्यांनी केलं



चिरंजीव आर्यमान पालवे यांनी श्रींची प्रतिष्ठापना केली. यावेळी पंकजाताई यांच्या मातोश्री प्रज्ञाताई मुंडे, भगिनी माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, चि.अगस्त्य खाडे व

# शिवमुद्रा प्रतिष्ठानच्या दहीहंडी सोहळ्यात जल्लोष

## उदयसिंह बोराडे यांच्या पुढाकाराला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मंठा/ प्रतिनिधी : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शिवमुद्रा प्रतिष्ठान आयोजित व शिवसेना पुरस्कृत भव्य दहीहंडी सोहळा उत्साहात व जल्लोषात शहरातील राऊत मैदान येथे संपन्न झाला. शिवमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक, शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्याला मंठापरतूर तसेच नेरसेवली भागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे, उद्योग आघाडी जिल्हाप्रमुख प्रल्हादराव बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, नगरसेवक प्रदीप बोराडे, तुळशीराम कुहिरे, विष्णुपंत चव्हाण, योगेश अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यात अभिनेत्री मानसी पाटील यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाचे आकर्षण वाढले. गोविंदा पथकांनी सादर केलेल्या थरारक दहीहंडीने उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. मंठापरतूर, नेरसेवली भागातील दहीहंडीप्रेमी नागरिक, गोविंदा पथके, शिवमुद्रा प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शिवमुद्रा प्रतिष्ठानचे सर्व सहकारी, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, गोविंदा पथके आणि कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागरिकांचे बोराडे यांनी आभार मानले.

# तुम्ही जरांगेंना भेटायला का गेला नाहीत?

## मराठा तरुणाचा ओम राजेनिंबाळकरांना फोनवरून सवाल, ऑडिओ क्लिप व्हायरल





धाराशीव। प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणाला आता १७ दिवस पूर्ण झाले आहेत. आंदोलनाच्या पुढील टप्प्यात १५ सप्टेंबरपासून मुंबईकडे कूच करण्याची घोषणा जरांगेंनी केली असून, १९ सप्टेंबरला मुंबईत पोहोचून आंदोलन करण्याचा त्यांचा निर्धार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांनाही समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागत असून, एका मराठा तरुणाने खासदार ओम राजेनिंबाळकर यांना थेट फोन करून जाब विचारल्याची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या कथित ऑडिओ क्लिपमध्ये एक तरुण ओम राजेनिंबाळकर यांना विचारत आहे की, मनोजदादांचे उपोषण सुरू असताना तुम्ही त्यांना सपोर्ट का करत नाही? तुम्ही तिथे का गेला नाहीत? यावर उत्तर देताना ओमराजेंनी विचारले की, मी यापूर्वी ११ वेळा जरांगेंना भेटून आलो आहे, ते तुम्हाला दिसले नाही का? मात्र तरुण तिथेच न थांबता म्हणाला की, सध्याच्या महत्त्वाच्या टप्प्यात तुम्ही गेला नाहीत. जेव्हा ओमराजेंनी आमदार कैलास पाटील जाऊन आल्याचे सांगितले, तेव्हा तरुणाने राजकीय पक्षांच्या गटांचा संदर्भ देत, आम्ही मराठा समाज म्हणून तुम्हाला मतदान करतो, हे चुकीचे आहे, अशा शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली. संबंधित क्लिपची स्वतंत्र पुष्टी झालेली नसल्याने संभाषणातील दावे सत्य असल्याचे निश्चितपणे सांगता येत नाही. एकीकडे राजकीय नेत्यांना मराठा तरुणांच्या प्रश्नांचा सामना करावा लागत असताना, दुसरीकडे कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती यांनी प्रसिद्धीपत्रक काढून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. राज्य सरकार जरांगे पाटील यांना वेळोवेळी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. सरकारच्या या चालढकल करण्याच्या भूमिकेमुळेच आज जरांगे यांच्यावर पुन्हा उपोषणाची वेळ ओढवली आहे, अशी सडकून टीका शाहू महाराजांनी केली आहे. तसेच, संपूर्ण कोल्हापूरचा सकल मराठा समाज जरांगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# हिंगोली पालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा

## विजेत्यांना दिली जाणार पारितोषीके, हिंगोली पालिकेचा निर्णय

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली पालिकेच्या वतीने पर्यावरणपुरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत शहरातील नागरीकांना सहभागी होता येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषीके दिली जाणार आहेत. पर्यावरणपुरक गणेशोत्सव स्वच्छ हिंगोली उपक्रमांतर्गत हि स्पर्धा घेतली जात असल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.हिंगोली नगर परिषदेच्या वतीने शहरात पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे हा या स्पर्धेचा उद्देश असून याद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली जाणार आहे.

या स्पर्धेत केवळ हिंगोली शहरातील नागरिक आणि कुटुंबेच सहभागी होऊ शकतील. गणेशोत्सव पूर्णपणे पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, यासाठी गणेशमूर्ती पर्यावरणपूरक, नैसर्गिक व शाश्वत साधनांपासून तयार केलेली असावी आणि तिला नैसर्गिक रंगांचाच वापर केलेला असावा असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सजावटीसाठी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळला पाहिजे. या शिवाय निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे. मूर्ती विसर्जनासाठी घरगुती विसर्जन किंवा नगरपरिषदेच्या कृत्रिम विसर्जन तलावाचा वापर करणे अपेक्षीत आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी त्यांच्याकडील पर्यावरणपूरक गणेशोत्सावाची छायाचित्रे व आवश्यक माहिती निर्धारीत पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांचे परीक्षण समितीमार्फत स्पर्धकांचे गुणांकन केले जाईल. स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य असून त्यासाठी १४ ते १८ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

स्पर्धेमध्ये विजेत्या ठरणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सव सजावट किंवा उपक्रमांना आकर्षक रोख बक्षीसे दिली जाणार आहेत.

या स्पर्धेत सहभागी होऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव – स्वच्छ व सुंदर हिंगोली या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन हिंगोली नगर परिषदेच्या नगराध्यक्षा रेखाताई श्रीरामदादा बांगर, उपनगराध्यक्ष अ. माबुद बागवान, मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांनी केले आहे.

# जिल्हा मार्गावर ५० मीटरमध्ये तब्बल १४ गतिरोधक:पिंपळगाव माळवी फाटा येथील प्रकार

अहिल्यानगर। प्रतिनिधी

वांबोरी ते शेंडी फाटा या प्रमुख जिल्हा मार्गावर प्रशासकीय अनास्थेचा आणि मनमानी कारभाराचा नमुना समोर आला आहे. पिंपळगाव माळवी फाटा परिसराजवळ अवघ्या ५० मीटर अंतराच्या आत तब्बल १४ गतिरोधक टाकले आहेत. निकष डावलून हे गतिरोधक केल्यामुळे दुचाकी पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. पांढरे पट्टे मारले नसल्याने वाहनचालक गोंधळून अपघाताची शक्यता आहे.

वांबोरी, डोंगरगण, पिंपळगाव माळवी, आढाववाडी यासह पंचक्रोशीतील गावांना जिल्ह्याच्या ठिकाणी जोडणारा हा मार्ग आहे. पिंपळगाव माळवी फाट्याजवळ वेगाने वाहन आल्यास, अपघात होण्याचा धोका आहे. यापार्श्वभूमीवर तेथे गतिरोधक टाकण्याची जुनीच मागणी होती. बांधकाम विभागाने निकष डावलून हे गतिरोधक उभारले आहेत. दरम्यान,सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासकीय यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, आम्ही तेथे रम्बलर स्ट्रिप्स बसवण्याबाबत सांगितले होते, परंतू तेथे डांबरी गतिरोधक टाकले. जेसीबीने ते काढून दोन्ही बाजुला काढून रम्बलर स्ट्रिप्स टाकू.

पिवळ्या रंबलर स्ट्रिप्स पुरेशा होत्या, पण बाकीचे ब्रेकर कोणत्याही स्टँडर्डचे नाहीत. रम्बलर स्ट्रिप्स लांबून दिसतात व सावकाश जावे असा त्याचा अर्थ आहे. स्पीड ब्रेकरसाठी एक कमिटी असते, त्या कमिटीची मंजुरी घ्यावी लागते. त्यावर पट्टे मारायला हवे होते. १४ गतिरोधकांची गरज वाटत नाही. एन.डी. कुलकर्णी, सेवानिवृत्त शहर अभियंता.

# वसमत येथून बेपत्ता झालेल्या ३ मुलीपैकी १ मुलगी सापडली

हिंगोली। प्रतिनिधी

वसमत येथून बेपत्ता झालेल्या तीन पैकी एका मुलीचा शोध लावण्यास पोलिसांना यश आले असून त्या मुलीला रविवारी ता.१३ रात्री तिच्या कुटुंबियांच्या हवाली करण्यात आले आहे. मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरून नातेवाईक रागावल्यामुळे निघून जाण्याच्या निर्णय घेतल्याचे तिने पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत सांगितले. आता उर्वरीत दोघींचा शोध सुरून त्यासाठी वसमतचे पथक मराठवाड्यासह तेलंगणा राज्यात गेले आहेत.

वसमत येथील एका भागातील दोन सख्या बहिणी व त्यांची एक मावस बहिण लगतच्या जिल्हयात शिक्षणासाठी राहतात. या अल्पवयीन मुली शनिवारी ता. १२ सुट्टी असल्यामुळे त्या तीनही मुली वसमत येथे घरी आल्या होत्या. मात्र घरी कोणी नसल्याने त्या काही वेळ थांबल्या त्यानंतर त्या नेमक्या कुठे गेल्या याची माहिती त्यांच्या कुटुंबियांना मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला. मात्र त्यांचा शोध लागला नसल्याने त्यांनी थेट वसमत शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली होती. पोलिस निरीक्षक सुधीर वाघ, उपनिरीक्षक सुधीर बोंडले, जमादार गजानन भोपे यांच्या पथकाने तातडीने एक पथक स्थापन करून मुलींचा शोध सुरु केला. दरम्यान, त्यापैकी एक मुलगी त्या शिक्षण घेत असलेल्या आश्रमशाळेजवळच सापडली. त्यानंतर पोलिसांनी तिला घेऊन वसमत गाठले. त्या मुलीची प्राथमिक चौकशी केल्यानंतर मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरून रागावल्यामुळे आम्ही परत आश्रमशाळेकडे जाण्याचा निर्णय घेतला. मात्र आश्रमशाळेजवळ आल्यानंतर दोघी कुठे गेल्या याची माहिती नसल्याचे त्या मुलीने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी त्या मुलीला तिच्या कुटुंबाच्या हवाली केले आहे. उर्वरत दोघींच्या शोधासाठी पोलिसांचे पथक मराठवाड्यासह तेलंगणात रवाना झाले असून त्या ठिकाणी त्यांचा शोध घेतला जात असल्याचे सुत्रांनी सांगितले.

# दुष्काळ व पीकविम्यासाठी शेतकऱ्यांचे उद्या ‘हलगी बजाव’ आंदोलन

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपस्थित रहा:–शेतकरी हक्क मोर्चा

बीड । प्रतिनिधी

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे सोयाबीन, कापूस यांसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्याच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करून पिकांचे पंचनामे करावेत, हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, तसेच मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा आणि यावर्षीचा पीकविमा तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, या मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भव्य ‘हलगी बजाव’ आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड येथे पत्रकार परिषद घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

शेतकऱ्यांना हक्काचा पीकविमा मिळावा, सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, २०२० सालचा प्रलंबित पीकविमा तात्काळ अदा करावा, अतिवृष्टीच्या काळात जाहीर केल्याप्रमाणे हेक्टरी १७ हजार रुपये पीकविम्यातून नुकसानभरपाई द्यावी, तसेच चालू वर्षाचा पीकविमा तातडीने मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, अशा विविध मागण्या शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. आंदोलनाच्या जनजागृतीसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नाळवंडी, लिंबागणेश, राक्षसभुवन, कुक्कडगाव, पिंपळगाव मांजरा, माळसापूर, एकनाथवाडी, उमरी, उमरत खालचा, नागापूर खुर्द, नागापूर बुद्रुक, बराणपूर, भाटसांगवी, कुर्लादगाव, माळापुरी, कामखेडा, बकरवाडी, घाटसावळी, कोल्हारवाडी, समनापूर, मोची पिंपळगाव, पाली, नेकनूर, मंजरी फाटा, पिंपळनेर आदी सुमारे ३० ते ३५ गावांत बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली.



शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, ज्ञानेश्वर राऊत, रामधन जमाले, बाळासाहेब मोरे, कुलदीप करपे, राजू गायके, सादिक पठाण, हनुमान घोडके, अर्जुन सोनवणे यांच्यासह मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**गावागावातून हलगीचा आवाज जिल्हाधिकारी कार्यालयावर घुमणार!**

शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गावागावातील शेतकरी हलगी (डफडे) वाजवत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल होणार आहेत. दुष्काळ जाहीर करा, नुकसानभरपाई द्या आणि प्रलंबित पीकविमा तात्काळ जमा करा, असा आवाज या आंदोलनातून शासनाच्या कानावर घातला जाणार आहे.

# संजय बनसोडे मातृभूमी प्रतिष्ठान कडून समाज रत्न पुरस्काराने सन्मानित



बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासह इतर सामाजिक समस्या विषयी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा मातृभूमी प्रतिष्ठान,बीडच्या वतीने प्रतिष्ठानचे मार्गदर्शक व 'महा.अंनिस'चे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ. डी. जी. तांदळे यांनी शाल पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देवून राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अंबाजोगाई स्थित 'मानवलोक'च्या भव्य सभागृहात दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रविवार रोजी आयोजित समितीच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीदरम्यान हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, बीड शाखेचे व्यसन मुक्ती विभागाचे बाजीराव ढाकणे, महिला विभागाच्या रुक्मिणी नागापुरे, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ नाईकवाडे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रदिप चव्हाण व अंबाजोगाई शाखेचे प्रमुख होते.

'महा.अंनिस'चे राज्य प्रधान सचिव विनायक सावळे,रुकसाना मुल्ला,व साथींसह राज्यभरातील समितीचे ३५४ शाखांचे शेकडो प्रमुख पदाधिकारी उपस्थिती होते.

# कर्ज देण्याच्या नावाखाली गरजूंची करोडोंची लूट

## नामांकित कंपन्यांच्या नावाने सोशल मीडियावर दरोडेखोरांची टोळी सक्रिय

बीड । प्रतिनिधी

सध्या सोशल मीडियावर कर्ज देण्याच्या नावाखाली बोगस अकाउंट उघडून अनेकांना कोट्यावधी रुपयाचा गंडा घालण्याचे प्रकार सर्रास चालू असून गरजू लोक त्यांच्या या अकाउंटला फसून पैसे टाकतात. आणि नंतर हे लोक आपले अकाउंट बंद करतात. मोबाईल नंबरही बंद करून ठेवतात. अशा दरोडेखोरांवर नियंत्रण नेमके कोण आणणार? हा मोठा प्रश्न आहे. देशभरात या लोकांचा धुमाकूळ चालू आहे. मात्र सरकारकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचे स्पष्ट होत आहे.

सध्या सोशल मीडियावर कर्ज देणाऱ्या अनेक बोगस कंपन्यांचे अकाउंट धुमाकूळ घालत आहेत. या बोगस अकाउंटला




अनेकजण फसून गरज म्हणून कर्जाच्या नावाखाली या लोकांकडून पैसे उकळले जात आहेत. सुरुवातीला कागदपत्राची मागणी केली जाते. त्यानंतर प्रोसेसिंग फिसच्या नावाखाली हजार- दोन हजार रुपये




मागितले जातात. त्यानंतर तुमच्या पैशाला सिक्युरिटी म्हणून इन्शुरन्स करण्यासाठी पुन्हा पैसे मागितले जातात. यावर विशेष म्हणजे आरबीआयच्या नावाखाली ही या बोगस कंपन्याकडून पैसे मागितले जातात. कुठेतरी




कानाकोपऱ्यात एखादे ऑफिस उघडून त्या ऑफिसचे चित्रीकरण पाठवले जाते. हा प्रतिनिधी आपले आधार, पॅन सर्व काही पाठवतो. मात्र हे सर्वच बोगस असते. या प्रकाराला फसून गरजू लोक आपली कागदपत्रे पाठवतात. आणि पैसेही पाठवतात. सुरुवातीला हजार -दोन हजार रुपये प्रोसेसिंग फीच्या नावाखाली मागितले जातात. त्यानंतर मग सात हजार -दहा हजार अशी रक्कम इन्शुरन्स च्या नावाखाली मागितली जाते आणि त्यानंतर मग दहा ते पंधरा हजार रुपये मागितले जातात. या प्रकाराने गरजू लोक त्रस्त झाले असून असे शेकडो बोगस कंपन्यांचे अकाउंट सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. लोकांची सर्रास लूट चालू असतांना सरकार मात्र या बोगस अकाउंट वर काहीही उपाययोजना करताना दिसत नाही. सायबर सेल कडे तक्रार केली तर केवळ तक्रार नोंदवली जाते. मात्र त्यानंतर त्याचे काय होते याचाही थांग पत्ता लागत नाही. हे लोक नेमके कुठे बसतात आणि कुठून ऑपरेट करतात हेही गरजूंना कळत नाही. त्यामुळे सध्या कोट्यावधी रुपयाची लुट चालू असून हा प्रकार थांबवण्यासाठी आता सरकारने पावले उचलली पाहिजेत अशी सर्वसामान्य जनतेची भावना आहे.

### सावधान रहा

**सोशल मीडियावर या बोगस कंपन्यांना फसून अनेक लोक पैसे टाकतात. मात्र ऑनलाईन व्यवहार करतांना आपल्या जिल्ह्यात त्यांचे कार्यालय आहे का? ते नेमके कुठे आहे? तिथे कोण बसते? याची चौकशी करणे गरजेचे आहे. आणि प्रत्यक्ष कार्यालयात जाऊनच नेमका काय प्रकार आहे हे पाहणे गरजेचे आहे. कर्जाची आवश्यकता असल्यास संबंधित कंपनीचे ऑफिस तुमच्या जिल्ह्यात असणे आवश्यक आहे. हे लोक जर खरोखर कंपनीचे असतील तर ते तुम्हाला सहकार्य करतात. मात्र ऑनलाईन पद्धतीने काम करणारे लोक बोगस आहेत हे अनेकदा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नागरिकांनीही सावधान राहून ऑनलाईन कर्ज घेण्याच्या पाठीमागे लागू नये प्रत्येकाने खात्री करून घ्यावी.**

# माजलगाव धरणाची उंचीवाढ शेतकऱ्यांच्या हिताला बाधक ठरू नये

## मुख्यमंत्री फडणवीस, पंकजाताई मुंडेना बदामराव पंडितांचे निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

माजलगाव धरणाची उंची वाढविण्याच्या प्रस्तावामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघ आणि माजलगाव तालुक्यातील २३ पुनर्वसित गावांतील शेतकरी व नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, धरणाची उंची वाढविण्याबाबत येथील शेतकऱ्यांची बाजू एकूण घ्यावी त्यांच्या हिताचे संरक्षण करावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



**२३ पुनर्वसित गावांच्या शेतकऱ्यांची बाजू समजून घ्यावी**

माजलगाव धरणाच्या उंचीवाढीच्या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर या २३ पुनर्वसित गावांतील शेतकऱ्यांनी यापूर्वीच धरणासाठी आपल्या जमिनी, घरे व गावांचा त्याग करून विस्थापनाचा त्रास सहन केला आहे. त्यामुळे धरणाची उंची वाढविल्यानंतर त्यांच्या शेती, जमिनी व उपजीविकेवर कोणताही परिणाम होऊ नये, अशी शेतकऱ्यांची रास्त अपेक्षा असल्याचे बदामराव पंडित यांनी निवेदनात म्हटले आहे.

धरणाची उंची वाढविण्याच्या विकासकामाला तत्त्वतः विरोध नाही, मात्र शेतकऱ्यांच्या हिताच्या किंमतीवर विकास नको, अशी सर्व शेतकऱ्यांची भूमिका आहे.

धरणाची उंची वाढविण्याची कार्यवाही शेतकऱ्यांच्या शंका दूर होईपर्यंत स्थगित करावी, २३ पुनर्वसित ◀◀ पान ३ वर

# डॉ. ओमप्रकाश शेटेंच्या निवासस्थानी गोमय गणरायाची प्रतिष्ठापना

**दिंद्रूडमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा आदर्श**

माजलगाव । प्रतिनिधी

गणेशोत्सव हा केवळ भक्तीचा नव्हे तर सामाजिक प्रबोधनाचा उत्सव आहे, याचा प्रत्यय दिंद्रूड येथे आला आहे. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते डॉ. ओमप्रकाश सदाशिवराव शेटे यांच्या दिंद्रूड येथील 'ओम साई शिल्प' या निवासस्थानी यंदा गोमयापासून बनवलेल्या १०० टक्के इको-



फ्रेंडली गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या हस्ते विधिवत पूजा करून मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

ही आकर्षक मूर्ती गावंदरा येथील संपदा गोशाळेतील गायीच्या शेणापासून (गोमय) साकारण्यात आली आहे. या मूर्तीमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) किंवा कोणत्याही रासायनिक रंगाचा वापर करण्यात आलेला नाही. ही मूर्ती पूर्णपणे नैसर्गिक आहे. या मूर्तीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विसर्जनानंतर ही मूर्ती पाण्यात प्रदूषण करणार नाही, तर थेट मातीत विसर्जित होऊन तिचे नैसर्गिक व सेंद्रिय खतात रूपांतर होणार असल्याची माहिती गोशाळेचे संचालक राम बडे यांनी दिली. यंदा संपदा गोशाळेने संस्थेच्या अध्यक्षा तथा बालरोग तज्ञ डॉ. सत्यभामा चोले (बडे) यांच्या मार्गदर्शनाखाली अशा १२५ गोमय गणेशमूर्ती बनवल्या असून, काही मूर्तींमध्ये तुळशीच्या बियांचा ◀◀ पान ३ वर

# छोटेवाडी शिवारात सहा एकर ऊस जळुन खाक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छोटेवाडी शिवारात गंगामसला सबस्टेशन कडुन खरात आडगाव येथे जाणार्या मेन लाईनची तार तुटून सहा एकर ऊस जळून खाक झाल्याची घटना दि.१४ सप्टेंबर सोमवार रोजी दुपारी १२:३० वाजता घडली. या आगीमध्ये छोटेवाडी शिवारातील गट सर्व्हे नंबर १०३ मधील शेतकरी एकनाथ माळेकर,हनुमंत माळेकर,भानुदास माळेकर यांचा प्रत्येकी दोन एकर याप्रमाणे एकूण सहा एकर ऊस जळून खाक झाला आहे. अगोदरच परिसरात गेल्या दिड महिन्यापासून पाऊस नसल्याने पिके करपुन गेली आहेत. त्यात हाता तोंडाला आलेले कसेबसे ऊसाचे पीक मेन लाईनची तार तुटून



एका तासात जळुन खाक झाले.महावितरणच्या या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांना दुष्काळात तेरावा महिना आला असल्याचे बोलले जात आहे .शेतामध्ये वाकलेले खांब, लोंबकाळणार्या तारा,तारांच घर्षण होऊन व तारा तुटून ऊस जळण्याचे प्रमाण परिसरात वाढले आहे. वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे ऊस जळल्याने येथील शेतकरी मेटाकुटीला आला आहे. महावितरण कंपनीने उसाची भरपाई करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. जळालेल्या उसाचा पंचनामा महावितरण व महसूल विभागाने घटनास्थळी येऊन तात्काळ करून नुकसान भरपाई द्यावी असी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## निष्काळजी वाहनचालना प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी

निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात केल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपीची मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड यांच्या न्यायालयाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने बीड येथील ड. नितीन एस. वेदपाठक यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.



सदर प्रकरणातील माहितीनुसार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता बीड-मांजरसुंबा रस्त्यावरील आहेर वडगाव परिसरात मोटारसायकलने प्रवास करणाऱ्या व्यक्तीला मागून आलेल्या मोटारसायकलने धडक दिली होती. या अपघातात संबंधित व्यक्तीस दुखापत झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.या घटनेप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५ ◀◀ पान ३ वर

# परळीतील घणशी व ब्रह्मगंगा नदी खोलीकरण, सरळीकरण व पुनर्जीवनासाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन

**मयंक गांधी यांच्या उपस्थितीत लोकसहभागातून नदी पुनरुज्जीवनावर होणार विचारविनिमय**

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील घणशी (वेणूमती) आणि ब्रह्मगंगा या दोन नद्यांच्या खोलीकरण, सरळीकरण व पुनर्जीवनासाठी आज दि. १५ सप्टेंबर रोजी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १० वाजता नगर परिषदेच्या डॉ. भालचंद्र वाचनालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये ही बैठक होणार आहे.



परळी शहराच्या जलसुरक्षेच्या दृष्टीने घणशी आणि ब्रह्मगंगा या दोन्ही नद्यांना विशेष महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर नदी खोलीकरण, सरळीकरण, जलस्रोतांचे संवर्धन आणि नदीपात्राचे पुनरुज्जीवन याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. विशेषतः लोकसहभागातून नदी पुनर्जीवनाचे व्यापक अभियान उभारण्याबाबत बैठकीत दिशा ठरविण्यात येणार आहे. नदी पुनर्जीवनासाठी आवश्यक उपाययोजना, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य नियोजन, नागरिकांचा सहभाग आणि भविष्यातील जलसुरक्षेसाठी प्रभावी कृती आराखडा यावर विचार विनिमय होणार आहे. ◀◀ पान ३ वर

# सावरलेल्या पुनर्वसित शेतकऱ्यांना पुन्हा उध्वस्त करण्याचा घाट थांबवा : दत्ता कांबळे

**माजलगाव धरण उंचीवाढीचा 'सरकारी' तुघलकी निर्णयाबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटणार**

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरणाच्या उंचीवाढीच्या 'सरकारी' निर्णयामुळे पुनर्वसित शेतकरी पुन्हा एकदा उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. गेल्या अनेक वर्षांच्या संघर्षानंतर, विस्थापनाच्या वेदना सोसून शेतकरी सावरला असताना पुन्हा त्याला जीवनातून उठवू नका, अशी भावनिक साद काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी सरकारला घातली आहे.



प्रसार माध्यमांना दिलेल्या पत्रकात काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी म्हटले आहे की, धरणग्रस्त शेतकऱ्यांनी यापूर्वी आपल्या जमिनी, घरे पुनर्वसनमध्ये गमावली आहेत. शासनाने दिलेल्या तुटपुंज्या मोबदल्यात आणि अल्पशा जमिनीत ते आपला संसार कसाबसा उभा करत आहेत.

आता पुन्हा धरणाची उंची वाढवून त्यांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच, माजलगाव धरणाच्या उंचीवाढीचा निर्णय तात्काळ थांबवण्यात यावा. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता घेतलेला निर्णय रद्द करावा. काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा पुनर्वसित विस्थापितांचे नेते दत्ता कांबळे यांनी सरकारला इशारा दिला की, जर धरण उंचीवाढीचा निर्णय तात्काळ मागे घेतला नाही, तर संघर्ष युवा शेतकरी समिती आणि पुनर्वसन शेतकऱ्यांच्या वतीने माजलगाव धरणात जलसमाधी आंदोलन होणार असून, यावेळी काही अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल. या ज्वलंत प्रश्नी लवकरच ◀◀ पान ३ वर

# जालन्यात अडीच कोटींचा अनोखा बाप्पा थाटात विराजमान

जालना । प्रतिनिधी

**रिध्दी- सिद्धीचा दाता, विघ्नहर्ता गणराया चे गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर सर्वत्र जल्लोषात आगमन झाले. संपूर्ण महाराष्ट्रात ख्याती प्राप्त जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात श्री अनोखा गणेश मंडळातर्फे १०८ किलो वजनी चांदीची सोन्याचा (सुवर्ण) मुलामा असलेल्या अडीच कोटींचा गणपती बाप्पांच्या मनमोहक मूर्तीस जल्लोष आणि थाटात विराजमान करण्यात आले.**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ रुपम हॉल येथून सजविलेल्या रथात मुर्तीची मंडळ स्थळापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.संबळ वाद्यांचा गजरात सदस्यांनी ठेका धरत गणपती बाप्पा मोरया,मंगल मुर्ती मोरया,,,, असा जल्लोषात गजर



केला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. उद्योजक रामनिवास मानधना, राहुल किशोर अग्रवाल ( रुपम) परिवारातील सदस्यांच्या हस्ते विधीवत पूजन करून आरती करण्यात आली.या वेळी उद्योजक अनिल गोयल,मंडळाचे अध्यक्ष रितेश मिश्रा,अतुल मंत्री, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम), योगेश मानधना, गोपाल मानधना, जगदीश मुंदडा,पुरूषोत्तम भक्कड,राजेश अग्रवाल, राजकुमार दायमा,हेमंत ठक्कर, गणेश तिवारी, किशोर अग्रवाल,रोहित भुरेवाल, नितीन मुथा, मनोज बंब,अजय अग्रवाल,जय सुरा,गणेश भुरेवाल, महावीर मरलेचा,यांच्यासह मंडळाचे सदस्य, श्री भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान दरवर्षी प्रमाणे यंदा ही भाविकांना वेगवेगळे देखावे, प्रसाद, कुटुंबियांसह आनंद घेता येईल असा मंडळाच्या नावाप्रमाणेच अनोखा गणेशोत्सव साजरा होणार असल्याचे संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, अध्यक्ष रितेश मिश्रा,अतुल मंत्री यांनी सांगितले.

# आष्टीच्या गणेशोत्सवाची शतकाहून जुनी परंपरा; 'पेठेचा राजा' आणि 'कसबेचा राजा' आजही मानाचे गणपती

**पेठेच्या राजाची यंदा १३३ वी स्थापना; वर्गणीची प्रथा नाही, नवसाने गणेशमूर्ती घेण्याची अनोखी परंपरा**

आष्टी । प्रतिनिधी

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आष्टी शहरात गणेशोत्सवाची समृद्ध आणि आगळीवेगळी परंपरा जपली जात आहे. सामाजिक एकोपा, धार्मिक श्रद्धा आणि पारंपरिक उत्साह यांचा सुंदर संगम असलेल्या आष्टीच्या गणेशोत्सवाला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. शहरातील 'पेठेचा राजा' आणि 'कसबेचा राजा' या दोन गणेश मंडळांना स्थापनेला शतक पूर्ण झाले असून, आजही त्यांचा मान आणि परंपरा अबाधित आहे.

यंदा 'पेठेच्या राजा'ची १३३



वी स्थापना होत आहे. या गणेश मंडळाचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे येथे गणेशमूर्ती भाविक भक्त आपल्या नवसपूर्तीनुसार घेतात. श्रद्धा आणि भक्तीच्या भावनेतून ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.

विशेष म्हणजे, पेठेचा राजा आणि कसबेचा राजा या दोन्ही मंडळांकडून आपल्या गल्लीव्यतिरिक्त इतर ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी मागितली जात नाही. त्यामुळे उत्सवासाठी लोकसहभाग आणि स्वयंस्फूर्तीला येथे विशेष महत्त्व आहे. सर्व जाती-धर्मांचे नागरिक एकत्र येत मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करतात. त्यामुळे आष्टीचा गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक सलोखा आणि एकतेचे प्रतीक ठरला आहे.

**आमदार सुरेश धस यांनाही 'पेठेच्या राजा'ची भक्ती**

मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांनाही 'पेठेच्या राजा'विषयी विशेष श्रद्धा असल्याचे मंडळाचे ज्येष्ठ सदस्य तथा आष्टीचे नगरसेवक किशोरमामा झरेकर यांनी ◀◀ पान ३ वर

# बालगंधर्व मुंबई आयोजित नृत्य स्पर्धेत गौरी सोळंके प्रथम

**जिल्ह्यातील नृत्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी; गौरीसह आई-वडिलांचे सर्वत्र अभिनंदन**

माजलगांव । प्रतिनिधी

बालगंधर्व मुंबई यांच्या वतीने बीड जिल्ह्यातील के. एस. के. कॉलेज, बीड येथे दि. १२ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत माजलगांव शहराजवळील आदर्श नगर, चिंचगव्हाण येथील रहिवासी गौरी बालासाहेब सोळंके हिने आपल्या उत्कृष्ट नृत्यकौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

गौरीने स्पर्धेत सादर केलेल्या नृत्यातून आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले. तिचा आत्मविश्वास, तालबद्धता, भावमुद्रा आणि आकर्षक सादरीकरण यामुळे तिने परीक्षकांची विशेष दाद मिळवत स्पर्धेत अव्वल स्थान मिळविले.गौरीच्या या उल्लेखनीय यशामुळे तिच्या



कुटुंबीयांसह आदर्श नगर, चिंचगव्हाण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नृत्य क्षेत्रात मिळविलेल्या या यशामुळे गौरीच्या कलागुणांना नवी प्रेरणा मिळाली असून, भविष्यातील तिच्या कलात्मक वाटचालीसाठी हे यश महत्त्वपूर्ण ठरणार आहे. गौरीच्या या यशामागे तिच्या आई-वडिलांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे. मुलीच्या कलागुणांना वाव देत तिला नृत्य क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या आई-वडिलांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे. गौरी बालासाहेब सोळंके हिने मिळविलेल्या या प्रथम क्रमांकाच्या यशाबद्दल तिचे तसेच तिच्या आई-वडिलांचे हार्दिक अभिनंदन होत असून, भविष्यातही तिने नृत्य क्षेत्रात अशीच उत्तुंग भरारी घ्यावी, यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26